# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email : vdodehu@gmail.com**

जा.क्र आस्था /१२६३ / २०२३-२४ दि.१०/ ०१/२०२४

## सर्वसाधारण सभा

नमुना 'अ' (नियम ३ पहा)

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा वार बुधवार दिनांक १७/०१/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

## नमूद 'अ' चे जोडपत्र

देहू नगरपंचायतीची बुधवार दिनांक १७/०१/२०२४ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाजचे विषय.

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

३) महाराष्ट्र नगरपरिषद ,नगरपंचायत (आकाश चिन्हे /स्काय साईन )व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण ) मार्गदर्शक्तत्वे,२०२३ या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४) देहू नगरपंचायत हद्दीतील संपूर्ण मालमत्तांचे सन २०२३-२०२४ ते २०२६-२०२७ या चतुर्थ वार्षिक करिता सुधारीत कर आकारणी करण्याकरिता आकारणीच्या दरास तथा लागू असलेल्या दराचे मूल्य ठरविणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायत हद्दीतील संपूर्ण मालमत्तांचे सन २०२३-२०२४ ते २०२६-२०२७ या चतुर्थ वार्षिक करिता मालमत्ता कारमध्ये शासन निर्णय नुसार शिक्षण कर व रोजगार हमी उपकाराचा दर ठरविणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) देहू शहरातील अनधिकृत बांधकामाच्या नोंदी मिळकत रजिस्टर वर घेण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

७) देहू नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता कराची व पाणीकराची १०० % वसुली करण्याकरिता उपाययोजनेस्तव पूर्ण कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना बक्षीस वितरण करण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

८) देहू नगरपंचायत मार्फत लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे व इतर दाखल्यांचे दर पत्रक ठरविणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९) देहू नगरपंचायत अंतर्गत नगररचना विभागामार्फत देण्यात येणाऱ्या परवानग्या करिता आकारण्यात येणाऱ्या शुल्का मध्ये सुधारणा करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

१०) देहू नगरपंचायत कार्यालयाकडून देण्यात येणारे विविध व्यवसाय अनुज्ञप्ती/ व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र व्यवसाय नुतनीकरण शुल्क करणेबाबतच्या दरास मंजुरी मिळणेबाबत.

११) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण )सुधारणा अधिनियम २०२१ मधील तरतुदी प्रमाणे दि.३१/१२/२०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड बांधकामे नियमाधीन करणेबाबत नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम ८१(४)अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत निर्णय होवून मिळणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१२) देहू नगरपंचायत मधील महिला व बालकल्याण समिती मार्फत महिलांसाठी हळदी कुंकु कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३) देहू नगरपंचायत हद्दीमधील पाणी पुरवठा वॉटर ऑडिट करण्याच्या दृष्टीने एअर व्हॉल बदलणे रॉ वॉटर फिल्टर वॉटरव मुख्य टाकीला फ्लो मिटर बसवणे व आवश्यक त्या ठिकाणचे स्लुयश व्हॉल बदलणेकामी चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४) मा.जिल्हाधिकारी सो.नियोजन शाखा यांचेकडील दि.०७/०९/२०२३ रोजीच्या पत्रावर चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५) देहू नगरपंचायत हद्दीमधील पिण्याचे पाणी बिल माफी करणे संदर्भात आलेल्या अर्जावर चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१६) देहू नगरपंचायत हद्दीमधील मिळकत धारकांचे पिण्याचे पाणीचे सध्यस्थितीत असलेले अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करणेबाबत व त्यांना दंड ठरवणे तसेच व्यवसाईक नळ कनेक्शन बाबत धोरण ठरविणेसाठी चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७) शासन परिपत्रक स्थायी निर्देशाप्रमाणे मा.मुख्याधिकारी यांना निवास्थान भाडे अदा करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८) देहू नगरपंचायत मार्फत २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन ),१५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन ), व ८ डिसेंबर नगरपंचायत वर्धापन दिन साजरा करणे कामी आवश्यक ती निविदा प्रक्रिया राबविणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१९) २६ जानेवारी निमित्त क्लास ४ च्या कर्मचाऱ्यांना गणवेश घेणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२०) वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान प्राप्त निधीतील कामाकरिता शासनाकडील दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ नुसार कार्यवाही करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२१) देहू नगरपंचायत हद्दीतील विविध उत्सव व सभांमध्ये उभारले जाणारे तात्पुरते मंडप यांना शुल्क आकारणी करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२) देहू नगरपंचायत हद्दीतील सुखा कचरा व ई वेस्ट गोळा करणे करिता एजन्सी नेमणूक करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२३) जुन्या देहू ग्रामपंचायतीची जागा तात्पुरत्या स्वरुपात तलाठी कार्यालयासाठी उपलब्ध करून देण्यासाठी चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२४) देहू नगरपंचायत हद्दीमधील प्रभाग क्र. १३ पोस्ट ऑफिस समोरील विश्वनाथ मुसुडगे ते मुंढेकर यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रिटीकरण करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

२५) देहू नगरपंचायत हद्दीमधील प्रभाग क्र. ९ अभंग हॉस्पिटल, साईनगरी, साईश्रुष्टी पार्क येथे पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे

२६) देहू नगरपंचायत हद्दीमधील चव्हाननगर भाग ३ मधील मयूर घनवट यांच्या घरापासून ते आनंद चव्हाण यांच्या घरापर्यंत बनवयाच्या रस्त्यासाठी एकवायर करण्यात येणाऱ्या जागेचा बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना टी डी आर किंवा एफ एस आय देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२५/१ [illegible] मुदतवाढ

२५/२ [illegible] मुदतवाढ

२५/३ जाधव [illegible]

देहू नगरपंचायत * ता. हवेली, जि. पुणे * स्थापना सन २०२०

सौ.पूजा दिवटे
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १७/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०१
ठराव क्रमांक :- ०१

विषय क्र. १ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र. १ :-सदरचा विषयानुसार मागील सर्वसाधारण सभेमधील पारित झालेल्या ठरावावर विचार विनिमय करण्यात आला. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आला.

सुचक :- सौ.रसिका स्वप्निल काळोखे.

अनुमोदक :- आदित्य चिंतामण टिळेकर.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा देहू, अध्यक्षा साहेब ,नगरपंचायत कार्यालय ,देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा

दिनांक :- १७/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- ०२

विषय क्र. २ :- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव क्र. २. :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्याचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत.

सुचक :- सौ.सपना जयेश मोरे.

अनुमोदक :- श्री.मयुर दत्तात्रय शिवशरण.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे

सभा विभाग

सर्वसाधारण सभा इतिवृत्त २३-२४ ठराव क्र.०३

दि. १६.०१.२०२४

विषय - महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायत (आकाश चिन्हे / स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) मार्गदर्शकतत्वे, २०२३ या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ - १. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपंचायत प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र.नप्रसं/का. ०६/२०२३/जाहिरा.१५५/२०२३/६३३८, दि. २१/११/२०२३.

२. शासन निर्णय क्र. पीएमसी-३०१०/प्र.क्र.३९४ (भाग-२)/नवि-२२ दि.२२/०६/२०२३

ठराव- शासन निर्णय क्र. पीएमसी-३०१०/प्र.क्र.३९४ (भाग-२) नवि-२२ दि.२२/०६/२०२३ नुसार महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायत (आकाश चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे (नियमन आणि नियंत्रण) मार्गदर्शक तत्वांना मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपंचायत जाहिरात नियम १९७० या नियमात जाहिरात कर आकारणी करणे तसेच होर्डीग जाहिरात फलकाना परवानगी देणे या बाबी अंतर्भूत आहेत. खाजगी अभिकरने जाहिरात प्रसिध्द करताना मोठ्या आकाराच्या दृष्टीस आकर्षक दिसणाऱ्या जाहिराती प्रसिध्द करत असतात. देहू नगरपंचायत मध्ये जाहिरात होर्डीग बाबत धोरण करणे, यापूर्वी करण्यात आलेले किमान आकारणी दर वाढ करणे आवश्यक आहे. यामुळे नगरपंचायतीचे आर्थिक उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

नगरपंचायतीच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नियम १९७० नुसार नगरपंचायत क्षेत्रातील आकाश चिन्ह व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण तसेच शासन निर्णय क्र. पीएमसी-३०१०/प्र.क्र.३९४ (भाग- २)/नवि-२२ दि.२२/०६/२०२३ नुसार महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत (आकाश चिन्हे / स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) मार्गदर्शकतत्वे, २०२३ या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन नगरपंचायत परिक्षेत्रात विविध होर्डिंग व जाहिरातींचे खालील नमुद नुसार दर निश्चित करणे व त्वरित सदर दरांप्रमाणे आकारणी करणेकामी या ठरावा द्वारे सभा मंजुरी देत आहे.

| अ.क्र. | जाहिरातीचा प्रकार | तपशील | दर |
|---|---|---|---|
| १. | आकाशचिन्ह (स्काय-चिन्ह) प्रकाशित जाहिरात | आकाश चिन्ह किंवा ज्याचा कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो ते आकाश चिन्ह | प्रती चौ.फुट रक्कम रु.७०/- (वार्षिक)+इतर शासकीय कर |
| २. | जाहिरात होर्डीग | १० फुट X २० फुट<br>२० फुट X १० फुट<br>२० फुट X २० फुट | प्रती चौ.फुट. रु.०३/- प्रती ०३ दिवसाकरिता + इतर शासकीय कर |
| | | ३० फुट X १५ फुट<br>३० फुट X २० फुट | प्रती चौ.फुट. रु.०३/- प्रती ०३ दिवसाकरिता + इतर शासकीय कर |
| ३. | आकाश चिन्ह अप्रकाशित जाहिरात | आकाश चिन्ह किंवा ज्याच्या कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासुन आकाशात दिसु शकतो ते आकाश चिन्ह असा आहे. | प्रती चौ.फुट रक्कम रु.५०/- (वार्षिक)+इतर शासकीय कर |
| ४. | इलेक्ट्रोनिक्स डिस्प्ले | एखाद्या संरचनेवर बसविलेला, इलेक्ट्रोनिक्स रित्या प्रवर्तित होणारा जाहिरात डिस्प्ले हा निऑन दिवे एल ई डी किंवा एलसीडी यांसारखे इलेक्ट्रोनिक्स किंवा विद्युत साधन. | रक्कम रु.१०,०००/- (वार्षिक) + इतर शासकीय कर |
| ५. | बस थांब्याच्या ठिकाणीवरील जाहिरात | बस थांब्याच्या ठिकाणच्या संरचनेवर भावार्थसुचक वर्णन किंवा त्यासारख्या अन्य देखाव्यासह प्रदर्शित केलेली जाहिरात असा आहे. | रक्कम रु.१०,०००/- (वार्षिक) +इतर शासकीय कर. |
| ६. | निर्देश फलक | खाजगी वा वाणिज्यीक आस्थापनेने आपल्या कार्यालयांचा किंवा वाणिज्यीक आस्थापनेची दिशा सुचित करण्यासाठी उभारलेला फलक असा आहे. (दुकानावरील १ बोर्ड वगळता) | प्रती चौ.फुट रक्कम रु.३०/- (वार्षिक)+इतर शासकीय कर |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | ग्लो साईन बोर्ड जाहिरात (BACK LIGHT) | धातूच्या सांगाड्याच्या पुढील बाजूस कोणतेही पारदर्शक, अर्धपारदर्शक पडदा असून तिच्या मागील बाजूकडून विद्युत दिव्यांचा उपयोग करून प्रदर्शित केलेली जाहिरात असा आहे | रक्कम रु.५,०००/-(वार्षिक) + इतर शासकीय कर |
| ८. | फिरते जाहिरात फिरणे | वाहनावर किंवा वाहनाच्या पाठीमागे बसविलेल्या एक किंवा दोन दर्शनी बाजूंना जाहिरात फलक (होर्डींग) किंवा दर्शक पटल(पॅनल) असा असून ते वाहन अशा रीतीने जाहिरात अधिक लागल्या प्रकारे प्रदर्शित करण्यासाठी मोकळ्या ठिकाणी उभे करणे अथवा फिरविणे | प्रती चौ.फुट रक्कम रु.३०/- (वार्षिक)+इतर शासकीय कर |
| ९. | वृक्ष संरक्षण जाळ्यावरील जाहिरात | देहू नगरपंचायतीच्या हद्दीतील वृक्षांना जाळी देणगीदाराने बसविल्यास त्याच्या नावाची जाहिरात मा.मुख्याधिकारी यांचे मान्यतेने व अटीने मोफत प्रदर्शित करता येईल व या व्यतिरिक्त त्याच्या नावाची जाहिरात वृक्ष जाळीवर करायची आहे. | रक्कम रु.२५००/-प्रती वृक्ष (वार्षिक)+ इतर शासकीय कर |
| १०. | किऑक्स T-CANTILE | खांबाच्या एका किंवा दोन्ही बाजूस प्रदर्शित केलेली जाहिरात असा आहे. | रक्कम रु.२५००/-प्रती किऑक्स प्रती बाजू (वार्षिक)+इतर शासकीय कर |
| ११. | सायकल वरील जाहिरात | फिरत्या सायकल वरील प्रसिध्द करायच्या जाहिराती. | प्रति दिन प्रती सायकल रु.५०/-+ इतर शासकीय कर |
| १२. | निशाण (बॅनर)/ जाहिरात फ्लेक्स | ज्यामध्ये जाहिरातीचा किंवा घोषणेचा किंवा लिखित मजकुराच्या समावेश आहे असे सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी असलेल्या कापड किंवा इतर कोणतेही साहित्य असा आहे. सण, उत्सव, स्वागत, समारंभ,जयंती इ.साठी जास्तीत जास्त तीन दिवस बॅनर लावता येईल.<br>६फुट X ३फुट , ८फुट X ३फुट , ८फुट X ६फुट | प्रती फलक रु.५००/- ... दिवसांकरिता त्यानंतर फलक स्वत: काढून घेणे आवश्यक आहे. + इतर शासकीय कर |
| १३. | रोड शो रस्त्यावर / चौकाच्या ठिकाणी / मोकळ्या जागेत | १.सिनेमाचित्रिकरण करण्याकरीता ३०००/- प्रती दिन + इतर शासकीय कर.<br>२. व्यवसायिक कामाकरीता २०००प्रतिदिन + इतर शासकीय कर.<br>३. सामाजिक संदेश करिता मुख्याधिकारी यांचे पूर्व मान्यतेने मोफत. | |
| १४. | लेखपट्टक दर्शस्क्रोराल ) (डिस्पले | याचा अर्थ जाहिरात प्रदर्शित करणाऱ्या दर्शक पटलावर मुद्रीत. यात अखंडीतपणे आवर्तन पध्दतीने फिरण्यासाठी कळ बसविलेल्या पेटीच्या आकारातील दर्शक पटल असा आहे मग ती प्रकाश योजना असलेली किंवा नसलेलो असेल. | प्रती स्क्रोराल डिस्पले रक्कम रु.१०००/-(वार्षिक)+इतर शासकीय कर |
| १५. | रस्त्यालगत भिंतींवरील लिखाण व रंगवणे | देहू नगरपरिषदेच्या सामाजिक व शासकीय कामा व्यतिरीक्त इतरांना परवानगी नाही. | शास्ती फी रु.२०००/- ... मालमत्ता विद्रुपण ... १९९६ नुसार कारवाई ... इतर शासकीय कर. |
| १६. | टुर ट्रॅव्हल्ससाठी आणि व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र | ना हरकत प्रमाणपत्र | रक्कम रु.२०००/- वार्षिक ... इतर शासकीय कर |

सुचक:- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक:-श्री.योगेश हनुमंत काळो...

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा

देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक ०४ ठराव क्रमांक -०४ दिनांक -१७/०१/२०२४

विषय - देहू नगर पंचायत हद्दीतील संपूर्ण मालमत्तांचे सन २०२३-२४ ते २०२६-२७ या चतुर्थ वार्षिक करिता सुधारित कर आकारणी करण्याकरिता आकारणीच्या दारास तथा लागू असलेल्या दराचे मूल्य ठरविणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे .

विषयाच्या अनुषंगाने देहू शहरातील मालमत्तांचे चतुर्थ वार्षिकी कर आकारणी सन २०२३-२४ ते सन २०२६- २७ च्या कर आकारणीच्या कामाकरिता सर्वेक्षण सुरु आहे. त्यानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये राज्य शासनाचे सन २०१० च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १० अन्वये सुधारणा करून इमारती व जमिनीचे भांडवली मूल्यावर मालमत्ता कर बसविण्याचे प्रयोजन केले आहे. त्यानुसार देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जमिनी व इमारतीवर भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर आकारणी करणे प्रस्तावित करत आहे.सन २०१९-२३ साली ग्रामपंचायत असताना ग्रामपंचायत नियमाप्रमाणे कर आकारणी केलेली होती परंतु सन २०२०-२१ मध्ये देहू नगरपंचायतीची स्थापना झाली आहे.त्यानुसार नगरपंचायती नियमानुसार कर आकारणी करणे अति आवश्यक बाब आहे. आजपर्यंत सदर मालमत्ता कराच्या दरामध्ये नगर पंचायत नियमा नुसार सुधारणा न झाल्यामुळे नगरपंचायतीला मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. तसेच या कर आकारणी मध्ये वृक्षकर ,अग्निशमन कर ,या मध्ये अंतर्भूत नाही.देहू हद्दीतील सर्व मिळकतींवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम १०५ नुसार नमूद सक्तीचे कराची आकारणी आकारणी करायची आहे .त्यानुसार या बाबतचे दर ठरविणे अति आवशक आहे .

त्यानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम ११४(३)(अ) मध्ये सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० (दिनांक २७ एप्रिल २०१०) नुसार सुधारणां अन्वये मालमत्ता कर आकारणी योग्य असलेल्या इमारती व जमिनीचे भांडवली मूल्य गणना करण्यासाठी मुबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या तरतुदीनुसार तयार केलेले मुबई मुद्रांक (संपत्ती वास्तविक मूल्य ठरविणे ) नियम १९९५ ने तयार केलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या मुद्रांक शुल्क सिद्धगणक (Ready Reckoner Rate) मध्ये दर्शविलेले कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मूल्य हे आधारित मानण्यात / संबोधण्यात येईल. तसेच प्रत्येक ५ वर्षानंतर इमारत व जमिनीच्या भांडवलीमूल्यामध्ये सुधारणा करून मालमत्ता करांची आकारणी कलम १२३ व १२४ प्रमाणे असेल.



Scanned with OKEN Scanner

इमारतीच्या किंवा जमिनींच्या प्रवर्गाच्या तपशिलांच्या बाबतीत आणि अशा विविध प्रवर्गांना द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या बाबतीत विनियम तयार करणेस तरतूद आहे. त्यानुसार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करून मुख्याधिकारी सर्वसाधारणसभेच्या मान्यतेने खालील प्रमाणे देहू नगरपंचायत हद्दीतील इमारती व जमिनी यांचे भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक विविध घटकांना आणि प्रवर्गांना द्यावयाचे बहुविध भारांकांच्या बाबतीत तरतूद करण्याकरिता नियम करीत आहोत. पुढील प्रमाणे :-

१. खुल्या जमिनीचे भांडवली मूल्य या नियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इमारतीच्या प्रसीमा मध्ये इमारतीला लागुन असलेल्या जमिनी व्यतिरिक्तरिक्त जमीन असेल तर अशी जमिन ही खुली जमीन असल्याचे समजण्यात येईल आणि नियम १६ चा पोटनियम (२) मध्ये तरतूद केल्या प्रमाणे दरा नुसार त्याचे भांडवली मूल्य निश्चित करण्यात येईल.

२. जमीन आणि इमारतीचे स्वरूप व प्रकारानुसार बहुविध भारांक हा अनुसूची १ नुसार आकारणी करणेत येईल.

३. इमारतीच्या वयोमानानुसार बहुविध भारांक हा अनुसूची २ नुसार आकारणी करणेत येईल.

४. कर गणना दर हा अनुसूची ३ मध्ये विनिदिष्ट केल्याप्रमाणे असेल.

५. भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी जाहिरात फलक किंवा टॉवर चे क्षेत्र भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी जाहिरात फलक आणि टॉवर चे क्षेत्र याचा अर्थ.

(क) जाहिरात फलकाच्या बाबतीत, जाहिरात फलक ज्या खांबावर उभारण्यात आला आहे अशा दोन टोकांवरील खांबा मधील अंतरही चौरसाची एक बाजू असल्याचे गृहीत धरून होणाऱ्या चौरसाचे क्षेत्र अधिक जाहिरातफलका चे असा आहे.

(ख) टॉवरच्या बाबतीत, टॉवरच्या पायाचे क्षेत्र असा आहे.

६. इमारतीच्या एकूण बांधीव क्षेत्रा मध्ये पुढील क्षेत्रांचा समावेश होईल -

(१) इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या बांधीवक्षेत्राची गणना करताना कोणत्याही पुढीलबाबींच्या बांधीवक्षेत्राची गणना करण्यात येईल :- (एक) इमारती मधील सदनिकांचे एकूण क्षेत्र, (दोन) तळमजला, (तीन) पोर्च व बाल्कणी (चार) पोडीयम,(पाच) सेवामजला, (सहा) आश्रयक्षेत्र, (सात) प्रवेश सभा कक्ष (पन्ट्न्स लॉबी), (आठ) आराम कक्ष, (नऊ) वॉचमन केबीन, (दहा) वातानुकूलित संयंत्र कक्ष, (अकरा) एअर हॅंडलींग कक्ष, (बारा) मलप्रवाह प्रक्रिया संयंत्रा करिता असलेले बांधकाम

(२) इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या बांधीव क्षेत्राची गणना करताना कोणत्याही पुढील बाबींच्या बांधीव क्षेत्रा ची गणना करण्यात येणार नाही:- (एक) सर्वात वरच्या मजल्या वरील उद्वाहन कक्ष, (दोन) लिफटवेल, (तीन) जिना कक्षा सह जिना आणि त्याची जागा



Scanned with OKEN Scanner

(चार) चिमणी आणि उद्वाहक टाकी, (पाच) मीटर कक्ष (सहा) पंप कक्ष,(सात) जमिनी खालील आणि वरील पाण्याची टाकी, (आठ) मलकुंड.

७. सदनिका किंवा इमारत अथवा तिचा भाग यांच्या भांडवली मूल्या ची निश्चिती :

(१) सदनिकेचे भांडवली मूल्य निश्चित करताना, नियम११, १२ किंवा यथास्थिती, नियम१३च्या पोट-नियम (१) यांच्या तरतुदींना अनुसरून, निश्चित केलेल्या नियम९ च्या पोट- नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही एका किंवा त्याहून अधिक संबंधित बाबींचे भांडवली मूल्याची सदनिकेच्या भांडवली मूल्या मध्ये भर घालण्यात येईल.

(२) इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य निश्चित करताना, नियम१३चेपोट-नियम (२) किंवा यथा स्थिति, पोटनियम (३) यांच्या तरतुदींना अनुसरून निश्चित केलेल्या नियम९च्या पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्या ही एका किंवा त्याहूनअधिक संबंधीत बाबींच्या भांडवली मूल्या मध्ये, इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या भांडवली मूल्या मध्ये भर घालण्यात येईल.

८. धार्मिक प्रयोजना साठी असलेल्या इमारतीच्या भांडवली मूल्याची निश्चिती:- मंदिर, मठ, गुरुद्वारा, मशीद, तख्त,चर्च,दर्गा,(सायनागॉग किंवाअग्यारी किंवा यांसारख्या धार्मिक प्रयोजनांकरिता असलेल्या इमारतीचे भांडवली मूल्य आणि धार्मिक पूजा अर्चाना किंवा कोणते ही धार्मिक विधी करण्यासाठी किंवा संबध्दधर्म, वंश किंवा संप्रदायांतील व्यक्तींना कर्मकांड करण्यासाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्याचा उद्देश असेल अशा इमारतींचे भांडवली मूल्यगणना करण्यासाठी निवासी वापराकरिता लागू असलेल्या आधारभूतमूल्याच्या दराच्या अर्ध्या दराने आणि या नियमां मध्ये तरतूद केलेले संबंधित बहुविधभारांक लागू करून, निश्चित करण्यात येईल.

९. माळा (लॉफ्ट) आणि पोटमाळा यांच्या भांडवलीमूल्याची निश्चिती : माळा किंवा पोटमाळ्याचे भांडवलीमूल्य हे पोटमाळयावरील सदनिकेच्या आधारभूत मूल्या इतक्या दराने आणि या नियमांमध्ये तरतूद केलेल्या संबंधित बहुविध भारांक लागू करून निश्चित करण्यात येईल.

१०.सदनिकेचा भाग किंवा इमारत किंवा तिचा भाग यांच्या इतर विवक्षित बाबींचे भांडवली मूल्याची निश्चिती :-

(१) पुढील पैकी कोणत्या ही एका किंवा त्याहून अधिक बाबी:- (एक) सेवामजला, (दोन) प्रवेश सभा कक्ष एन्ट्रन्स लॉबी, आणि आराम कक्ष यांचे भांडवली मूल्य हे, या कोणत्याही बाबी इमारतीचा किंवा तिच्या भागाचा भाग असतील तर,इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या आधारभूत मूल्याच्या संबंधित दराने आणि या नियमा मध्ये तरतूद केलेला संबध्द बहुविध भारांक लागू करून निश्चित करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

११.बांधकाम पाडलेल्या इमारतीच्या संबंधात भांडवली मूल्याची निश्चिती.

(२) एखादी इमारत पूर्णपणे पाडण्यात आली असेल किंवा पूर्ण पणे कोसळली असेल तर, ती जमीनखुली जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि तिचे भांडवली मूल्य, नियम१६मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तद्नुसार निश्चित करण्यात येईल.स्पष्टीकरण या नियमाच्या प्रयोजनार्थ, या द्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, जेथे एखादी इमारत पाडण्यात आली असेल किंवा पाडण्यात येत असेल किंवा कोसळली असेल तर परिणामी तो जमीन खुली असेल किंवा खुली करू नदेण्यात आली असेल किंवा केवळ भिंत किंवा तत्सम काही असेल परंतु तेथे ज्याचा भोगवटा सांगता येईल असे कोणत्याहीप्रकारचे बांधकाम नसेल आणि असे बांधकाम पाडल्यावर किंवा कोसळल्यावर पाडलेल्या किंवा कोसळलेल्या इमारतीचा ढिगारा किंवा कोणताही उर्वरित भाग अद्याप दूर केलेला नसेल तर, अशा इमारतीची जमीन ही खुली जमीन असल्याचे मानण्यात येईल.

(३) जेथे एखाद्या इमारतीचा केवळ भाग पाडण्यात आला असेल किंवा अंशतः /अंशताः कोसळलेला असेल आणि उर्वरित भागाचा भोगवटादार भोगवटा करीत असतील तर, पाडण्यात आलेल्या किंवा कोसळलेल्या इमारतीच्या भागाची जमीनही, खुली जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि भोगवटयात असलेल्या बांधकामाचा भाग हा त्याचे भांडवली मूल्यनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी एखादी इमारत असल्याचे समजण्यात येईल,

(४) पोट-नियम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी उपकर प्राप्त इमारत पाडण्यात आली असेल किंवा पाडण्यात येत असेल, किंवा कोसळलेली असेल तर पाडण्यात आलेल्या किंवा कोसळलेल्या इमारतीची जमीन किंवा तिचा भा हा, खुली जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि त्याचे भांडवली मूल्य, तिला खुली जमीन समजून निश्चित करण्यात येईल.

१०.आरामदायी आर सी सी इमारती मधील सोयी सुविधांचे भांडवलीमूल्य स्वतंत्र प्रमाणे पुन्हा निश्चित न करणे या नियमांन्वये आरामदायी आर सी सी इमारतीचे भांडवली मूल्य निश्चित केले असेल तर "आरामदायी इमारत या शब्दप्रयोगाच्या व्याख्ये मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सोयी सुविधांसाठी कोणते ही भांडवलीमूल्य, मालमत्ता कर बसविण्याच्या प्रयोजनासाठी स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येणार नाही.

११.खुली जमीन किंवा इमारत किंवा तिचा भाग याचे भांडवली मूल्य हे, अधिनियम आणि हे नियमयाच्या तरतुदी अन्वये पुढील रीतीने निश्चित करण्यात येईल.

(१) इमारतीचे भांडवलीमूल्य (Capital Value) =

बांधकामाचे /इमारती चे क्षेत्रफळ (Built-up Area)

X इमारतीच्या वापराच्या प्रकारा नुसार बांधकामा चे दर(Ready Reckoner Rate)

Xइमारतीच्या वयोमानानुसार बहु विधभारांक (Age Factor)



Scanned with OKEN Scanner

Xइमारतीच्या बांधकाम प्रवर्गा नुसार भारांक (Construction Class Factor)

मालमत्ताकर = इमारतीचे भांडवली मूल्य (Capital Value)X मालमत्ता कराचा दर (Tax Rate).

(२) जमिनीचे भांडवली मूल्य — जमिनीचे क्षेत्रफळ X जमिनीचे वार्षिक मूल्यदर.
मालमत्ताकर = जमिनीचे भांडवलीमूल्य X मालमत्ता कराचा दर.

अनुसूची १ -जमीन आणि इमारतीचे स्वरूप व प्रकारानुसार बहुविध भारांक
अनुसूची २ - इमारतीच्या वयोमानानुसार बहुविध भारांक
अनुसूची ३ - कर गणना दर

(३) महाराष्ट्र (नागरीक्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम१९७५मध्ये दि. २७एप्रिल, २०१० च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १० नुसार कलम १८ मध्ये केलेल्या सुधारणे नुसार पोटकलम (१) व (२) मध्ये निश्चित करणेत आलेल्या इमारतीच्या किंवा जमीनीच्या भांडवली मुल्याच्या ०.५टक्केहून अधिक असनार नाही. अशा दराने वृक्ष उपकर आकारला जाईल. त्या नुसार देहू नगरपंचायत हद्दीमध्ये अनुसूची ४ मध्ये नमूद केले प्रमाणे बहुविध भारांक नुसार वृक्ष उपकराची आकारणी करणेत येईल.

(४) महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ मधील प्रकरण क्र. २ कलम ४(a) (ii) मध्ये नमुद केले प्रमाणे पोटकलम (१) व (२) मध्ये निश्चित करणेत आलेल्या इमारतीच्या किंवा जमीनीच्या भांडवलीमुल्याच्या ०.०१ टक्के पेक्षा जास्त आणि०.३ टक्के पेक्षा कमी दराने शिक्षण उपकराची आकारणी करावी. त्या नुसार देहू नगरपंचायत हद्दी मध्ये अनुसूची ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे बहुविध भारांकनुसार शिक्षण उपकराची आकारणी करणेत येईल.

(५) महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम१९६२मधील प्रकरणक्र. २ अ कलम ६ ब (3) (1) मध्ये नमुद केले प्रमाणे पोटकलम (१) व (२) मध्ये निश्चित करणेत आलेल्या इमारतीच्या किंवा जमीनीच्या भांडवलीमुल्याच्या ०.००५ टक्के पेक्षा जास्त आणि ०.१० टक्के पेक्षा कमी दराने रोजगार हमी उपकराची आकारणी करावी. त्यानुसा देहू नगरपंचायत हद्दी मध्ये अनुसूची ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे बहुविध भारांक नुसार रोजगार हमीउपकराची आकारणी करणेत येईल.



Scanned with OKEN Scanner

(६) घनकचरा उपयोगकर्ता शुल्क हे घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधिनियम २०१६ व सुधारणा २०१८ मधील तरतुदीनुसार अनुसूची ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आकारणी करण्यात येईल.

(७) अनधिकृत बांधकाम शास्ती हे महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९अ, सन 2018 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.53, दि.10.08.2018, व नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-2018/प्र.क्र.73/नवि-14 दि. 27 सप्टेंबर, 2018 अन्वये लागू करण्यात येईल.

(८) अग्निशमन कर हा नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे स्थायी निर्देश क्रमांक ३१ दिनांक २५ एप्रिल २००५ नुसार व अग्निशमन व आणीबाणी सेवे च्या व्यवस्थापना साठी शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्र एम उ जी १०८९/१२८८/प्र/क्र४१/९१/नवि -३२ दिनांक १/४/१९९२ नुसार नगरपरिषदांनी मालमत्ता करांच्या किमान २ % दराने अग्निशमन कर आकारण्यात येईल.

(९) दिवाबत्ती कर हा प्रती मालमत्ता ५० रुपये प्रमाणे आकारण्यात येईल.

(१०) स्वच्छता कर हा प्रती मालमत्ता १८०/-रुपये प्रमाणे आकारण्यात येईल.

१२.मुद्रांक शुल्क मुल्यांकनाची मार्गदर्शक तत्वे लागून होणे. सिध्दगणका मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या "मुद्रांक शुल्क मुल्यांकनाची महत्वाची मार्गदर्शक तत्वे यामध्ये काही अंतर्भूत असले तरी, या नियमामध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचे या मार्गदर्शक तत्वावर प्रामुख्य असेल आणि मुद्रांक शुल्क मुल्यांकनाची मार्गदर्शक तत्वे, अधिनियमान्वये आणि या नियमा अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्या करिता लागू होणार नाहीत. नोंदणी व मुद्रांक विभाग ,महाराष्ट्र शासन बाजारमूल्य दर पत्रक मध्ये २०२३-२४ चे दर जाहीर केले आहेत.त्यानुसार आकारणी करण्यात यईल. परंतु देहु शहरात काही सर्वे क्रमांवर खुली जमीन,निवासी सदनिका व ऑफीस/दुकाने,औद्योगिक मालमत्तांचे दर दिलेले नाहीत यावर गाव निहाय व क्षेत्रनिहाय जो सर्वात कमी दर असेल.तो दर ग्रहय धरून कर आकारणी करण्यात येईल.

| एरिया (गाव) | खुली जमिन | निवासी सदनिका | बिगर निवासी सदनिका | औध्योगिक |
|---|---|---|---|---|
| देहूगाव | ६७८० | ४८२६० | ६४६१० | ६४६१० |
| माळीनगर | ३७४० | ४३३७० | ४९५६० | ४९५६० |
| विठ्ठल नगर | ४०५० | ३६२८० | ५२२९० | ५२२९० |



Scanned with OKEN Scanner

इमारतीं च्या व जमिनींच्या भांडवली मुल्यनिर्धारण व कराची आकारणी करिता बहुविध भारांक.

अनुसूची १

जमीन आणि इमारतीचे स्वरूप व प्रकारानुसार बहुविध भारांक.

| अ.क्र. | इमारत प्रकार | बहुविधभारांक |
|---|---|---|
| १ | आर.सी.सी पध्दतीचे | १ |
| २ | इतर पक्के (लोड बे अरींग किंवा दगड.विटांचे, चिरा, चुना किंवा सिमेंटचे घर) | ०.८ |
| ३ | अर्धपक्के (दगड, विटांचे, चिरा मातीचे घर)/पत्रा शेड | ०.६ |
| ४ | कच्चेघर ( झोपडी किंवा माती चेघर) | ०.४ |
| ५ | खुली/पडसरजागा | १ |

अनुसूची २

इमारतीच्या वयोमानानुसार बहुविध भारांक.

| अ.क्र. | इमारतीचेवयोमान (वर्षामध्ये) | बहुविधभारांक |
|---|---|---|
| १ | ० ते१०वर्षापर्यंत | १.०० |
| २ | १० वर्षापेक्षा जास्त व २० वर्षापर्यंत | ०.९० |
| ३ | २० वर्षापेक्षा जास्त व ३० वर्षापर्यंत | ०.८० |
| ४ | ३० वर्षापेक्षा जास्त व ४० वर्षापर्यंत | ०.७० |
| ५ | ४० वर्षापेक्षा जास्त व ५० वर्षापर्यंत | ०.६० |
| ६ | ५० वर्षानंतर | ०.५० |



Scanned with OKEN Scanner

अनुसूची ३

कर गणना दर

| अ.क्र. | कराचाप्रकार | कराचा दर निवासी | बिगरनिवासी | औद्योगिक |
|---|---|---|---|---|
| १ | मालमत्ता कर | ०.१२०% | ०.१८% | ०.१६% |
| २ | वृक्षउपकर | ०.०१०% | ०.०१०% | ०.०१०% |
| ३ | दिवाबत्ती कर (प्रती मालमत्ता ) | ५० रुपये | ५० रुपये | ५० रुपये |
| ४ | अग्निशमन कर(मालमत्ता कारच्या ) | २ % | २ % | २ % |
| ५ | शिक्षणउपकर | ०.०१०% | ०.०१०% | ०.०१०% |
| ६ | रोजगार हमी उपकर | लागू नाही | ०.००५% | ०.००५% |
| ७ | उपयोग कर्ता शुल्क | मा. शासन निर्णयानुसार | मा. शासन निर्णयानुसार | मा. शासन निर्णयानुसार |
| ८ | स्वच्छता कर (प्रती मालमत्ता रुपये ) | १८०/- | १८०/- | १८०/- |

अनुसूची ४

घनकचरा उपयोग कर्ता शुल्क बाबत दर.(मा शसन राजपत्र असाधारणभाग 4 ब .जुलै 1 ,2019 नुसार )

| अ.क्र. | वर्गवारी | रक्कमरू. (प्रतिमहा) | रक्कमरू. (वार्षिक) |
|---|---|---|---|
| | **घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षाकमी** | | |
| १ | प्रतिघर | १५/- | १८०/- |
| | **व्यवसायिक अस्थापना** | | |
| २ | दुकाने | ३०/- | ३६०/- |
| ३ | शोरुम (उपकरणे/फर्निचर/ऑटोमोबाइल/इलेक्ट्रॉनिक्सइ.) | ६० /- | ७२०/- |
| ४ | गोदामे | ६० /- | ७२०/- |
| ५ | उपहार गृहे व हॉटेल | ६० /- | ७२०/- |
| ६ | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | ८० /- | ९००/- |
| | **रुग्णालये** | | |
| ७ | पन्नास खाटांपेक्षा कमी | ६० /- | ७२०/- |
| ८ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | ९० /- | १०८०/- |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| संस्था | | | |
| ९ | शैक्षणिक संस्था, वसतिगृहे | ४५ /- | ५४०/- |
| १० | धार्मिक संस्था | ४५ /- | ५४०/- |
| ११ | शासकिय/ निमशासकिय/ कार्यालये | ४५ /- | ५४०/- |
| १२ | विवाह कार्यालये/ मनोरंजन सभागृहे/ एक पडदा चित्रपट गृहे | ३०० /- | ३६००/- |
| १३ | फेरीवाले | १५ /- | ३६०/- |

अनुसूची ५

अनधिकृत बांधकाम शास्ती बाबत दर

| वापर | बांधकाम क्षेत्र पासून (चौ.मीटर) | बांधकाम क्षेत्र पासून (चौ.मीटर) | दर |
|---|---|---|---|
| निवासी | १ | ५५.७४ | शास्ती लागू नाही |
| | ५५.७५ | ९२.९० | मालमत्ता कराच्या आर्धी रक्कम |
| | ९२.९१ | त्यापुढे | मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम |
| बिगरनिवासी | लागू नाही | लागू नाही | मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम |

दर अनुसूची ६

सन २०२३-२०२४ करिता लागू असलेले मुद्रांक शुल्क सिद्धगणक (Ready Reckoner Rate)

| अ.क्र. | दर सूची | दर (चौ.मी) |
|---|---|---|
| 1 | देहू गाव -खुली जमीन | ६७८० /- |
| 2 | देहू गाव -निवासी सदनिका | ४८२६०/- |
| 3 | देहू गाव –व्यायासायिक | ६४६१०/- |
| 4 | देहू गाव - औद्योगिक | ६४६१०/- |
| 6 | माळीनगर -खुली जमीन | ३७४०/- |
| 7 | माळीनगर -निवासी सदनिका | ४३३७०/- |
| ८ | माळीनग़र – व्यावसायिक | ४९५६०/- |
| 10 | माळीनगर -औद्योगिक | ४९५६०/- |
| 21 | विठ्ठल नगर - खुली जमीन | ४०५०/- |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | विठ्ठल नगर - निवासी सदनिका | | ३६२८०/- |
| | विठ्ठल नगर - व्यावसायिक | | ५२२१०/- |
| 25 | विठ्ठल नगर - औद्योगिक | | ५२२१०/- |

*वरील दर https://easr.igrmaharashtra.gov.in/ या वेबसाईट वरील दिलेल्या दराप्रमाणे दर वर्षी बदल करण्यात येतील.करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे .

सूचक : श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री प्रवीण रामदास काळोखे

<u>ठराव सर्वानुमते मंजूर</u>

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

<u>सर्वसाधारण सभा</u>

विषय क्रमांक ०५ ठराव क्रमांक -०५ दिनांक -१७/०१/ २०२४

विषय - देहू नगर पंचायत हद्दीतील संपूर्ण मालमत्तांचे सन २०२३-२४ ते २०२६-२७ या चतुर्थ वार्षिक करिता मालमत्ता करामध्ये शासन निर्णयानुसार शिक्षण कर व रोजगार हमी उपकराचा दर ठरविणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे .

विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये राज्य शासनाचे सन २०१० च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १० अन्वये सुधारणा करून इमारती व जमिनीचे भांडवली मूल्यावर मालमत्ता कर बसविण्याचे प्रयोजन केले आहे. त्यानुसार देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जमिनी व इमारतीवर भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर आकारणी करणे प्रस्तावित करत आहे.

सन२०१९-२३ साली ग्रामपंचायत असताना ग्रामपंचायत नियमाप्रमाणे कर आकारणी केलेली होती परंतु सन २०२०-२१ मध्ये देहू नगरपंचायतीची स्थापना झाली आहे. आजपर्यंत सदर मालमत्ता कराच्या दरामध्ये नगर पंचायत नियमा नुसार सुधारणा झालेली नसून यामुळे नगरपंचायतीला मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. तसेच या कर आकारणी मध्ये शासनाचा शिक्षण कर व रोजगार हमी कर देखील या मध्ये अंतर्भूत नाही.देहू हद्दीतील सर्व मिळकतींवर निवासी मालमत्ता करिता शिक्षणकर व व्यावसायिक मालमत्तेवर शिक्षण कर रोजगार हमी उपकर आकारणी करायची आहे .

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ मधील सुधारणा असाधारण राजपत्र २०१२ दिनांक ३ डिसेम्बर २०१२ नियम ३ (अ)(ii) मध्ये निश्चित करणेत आलेल्या इमारतीच्या किंवा जमीनीच्या भांडवलीमुल्याच्या ०.०१ टक्के पेक्षा जास्त आणि ०.३ टक्के पेक्षा कमी दराने शिक्षण उपकराची आकारणी करावी. त्या नुसार देहू नगरपंचायत हद्दी मध्ये अनुसूची १ मध्ये नमुद केलेप्रमाणे बहुविध भारांकनुसार शिक्षण उपकराची आकारणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे .

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ मधील सुधारणा असाधारण राजपत्र २०१२ दिनांक ३ डिसेम्बर २०१२ नियम ५ (अ) (ii) मध्ये निश्चित करणेत आलेल्या इमारतीच्या किंवा जमीनीच्या भांडवलीमुल्याच्या ०.००५ टक्के पेक्षा जास्त आणि ०.१० टक्के पेक्षा कमी दराने रोजगार हमी उपकराची आकारणी करावी. त्यानुसार देहू नगरपंचायत हद्दी मध्ये अनुसूची १ मध्ये नमुद केलेप्रमाणे बहुविध भारांक नुसार रोजगार हमी उपकराची आकारणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे .

Scanned with OKEN Scanner

अनुसूची १

शिक्षण उपकर रोजगार हमी उपकर कर गणना दर

| क्र.क्र. | कराचाप्रकार | कराचा दर | | |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | बिगरनिवासी | औद्योगिक |
| ३ | शिक्षण उपकर | ०.०१०% | ०.०१०% | ०.०[illegible] |
| ४ | रोजगार हमी उपकर | लागू नाही | ०.००५ % | ०.००[illegible] |

सूचक : श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री प्रवीण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक ०६ ठराव क्रमाक -०६ दिनांक -१७/०१/ २०२४

विषय - देहू शहरातील अनाधिकृत बांधकामाच्या नोंदी मिळकत रजिस्टरवर घेण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सध्या स्थितीत नगरपंचायत मिळकत रजिस्टर वर ७३१३ मालमत्तांची नोंद आहे नगर पंचायती मार्फत चालू असलेल्या सर्वेमध्ये अंदाजे १३,००० मालमत्तांचा सर्वे करण्यात आलेला आहे असे असताना मालमत्ता धारक हे नगर पंचायतीची कोणती परवानगी न घेता बांधकाम करत आहेत .त्यामुळे अनधिकृत बांधकामांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे .शहरातील जवळपास ८५ % बांधकाम अनधिकृत आहे.तसेच अश्या प्रकारच्या नोंदी झाल्यास या मालमत्ता धारक प्राथमिक सुविधा करिता प्रशासना कडे मागणी करतात .परंतु या मालमाता धारकांनी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताल्याने या ठिकाणी नियोजन बद्ध काम करणे कठीण होते. या सर्व बाबी मुळे नगरपंचायतीचे विकास शुल्क बुडत आहे .

वरील बाबींचा विचार करता हि सभा असे ठरविते कि ,या पुढे अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद,नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८१अ,व सन 2018 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.53, दि.10.08.2018. व नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-2018/प्र.क्र.73/नवि-14 दि. 27 सप्टेंबर, 2018 अन्वये कार्यवाही करण्यात यावी.या बाबत ठराव सर्वानुमते मंजूर कण्यात येत आहे.

सूचक : श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री प्रवीण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ता. हवेली, जि. पुणे. स्थापना सन २०२०

सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

<u>सर्वसाधारण सभा</u>

<u>विषय क्रमांक ०७</u>

<u>ठराव क्रमांक</u> -०७ दिनांक -१७/०१/ २०२४

विषय - देहू नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता कराची व पाणी करायने 100% वसुली करण्याकरिता उपाय योजनेस्तव पूर्ण कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना बक्षीस वितरण करण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

उपरोक्त संदर्भित विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते कि,शासना च्या सुधारित धोरणा नुसार वित्त आयोगाचा निधी प्राप्त होण्याकरिता कर वसुलीमध्ये वाढ होणे हि आवश्यक आहे .असे असताना सध्यस्थितीत नगर पंचायतीची मालमत्ता कराची मागील थकबाकी ही ९ कोटी व चालू मागणी ४.१५ कोटी एकूण मागणी १३.१५ कोटी आहे. वाढती थकबाकी पाहता जे नागरिक मालमत्ता कर व पाणी कराचा २५ जानेवारी २०२३ पूर्ण भरणा करतील अश्या ५० नागरिकांना(lucky draw )पद्धतीने नगरपंचायती मार्फत २५ जानेवारी पर्यंत वसूल होणाऱ्या रकमेच्या प्रमाणात गृहउपयोगी वस्तू बक्षिस म्हणून वाटप केल्यास मालमत्ता धारकांचा घरपट्टी व पानीपट्टी भरण्याकडे कल वाढून नागरपंचायतीची वसुली वाढण्यास मदत होईल.व वसुली ची टक्केवारी वाढण्यास मदत होईल.

वरील बाबींचा विचार करता हि सभा असे ठरविते कि,उक्त संकल्पना हि कर वसुली मध्ये वाढ होण्यासाठी उत्तम आहे.अश्या उपाय योजना कर वाढीसाठी पोषक ठरतील .परंतु चालू आर्थिक वर्षातील उरलेले दिवस पाहता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वेळे अभावी हि संल्पना न राबवता आगामी आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षात हि योजना राबविण्यात यावी.या करिता मंजुरी प्रदान कण्यात येत आहे

सूचक : श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री प्रवीण रामदास काळोखे

<u>ठराव सर्वानुमते मंजूर</u>

सौ पूजा अमोल दिवटे

अध्यक्ष

देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय,देहू

विषय क्र.८ :- देहू नगरपंचायत मार्फत लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे व इतर दाखल्यांचे दर पत्रक ठरविणे बाबत.

ठराव क्र. ८ :- उपरोक्त विषयाच्या, अनुषंगाने नगरपंचायती मार्फत लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने शहरातील नागरिकांना विविध सुविधा पुरविण्यात येतात त्यामध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्र,जन्म - मृत्यू प्रमाण पत्र,तसेच इतर दाखले व सेवा नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना देण्यात येतात परंतु याबाबत किती शुल्क घेण्यात यावे याबाबत नगरपंचायत स्तरावर दर ठरविण्यात आलेले नाहीत. सद्यस्थितीत ही प्रमाणपत्र देताना ग्रामपंचायतीच्या प्रचलित दर नुसार आकारणी करण्यात येत आहे. नगरपंचायती मार्फत पुरवण्यात येणारे संलग्न सेवा पुरवताना नगरपंचायतीच्या आर्थिक उत्पन्नाचा विचार करतात सदर दरामध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे नगरपंचायत देहूच्या सर्वसाधारणे सभेत हा विषय ठेवून सभेच्या मान्यतेने दरामध्ये सुधारणा करणे उचित राहील. करिता माहिती व पुढील आदेश स्तरावर सादर.

| अ.क्र. | दाखला प्रकार | सध्याचे प्रचलित दर | सुधारित दर |
|---|---|---|---|
| १. | जन्म - मृत्यू दाखला | २०/-रु (प्रति प्रिंट) | ३०/- (प्रति प्रिंट) |
| २. | विवाह नोंद फी | प्रथम वर्ष २७०/-<br>पुढील वर्षास प्रत्यकी ५०/- | प्रथम वर्ष ५००/-<br>पुढील वर्षास प्रत्यकी १००/- |
| ३. | नमुना नं ४३ | २०/-रु (प्रति प्रिंट) | ३०/- (प्रति प्रिंट) |
| ४ | थकबाकीदार नसलेचा दाखला | २०/-रु (प्रति प्रिंट) | ३०/- (प्रति प्रिंट) |
| ५ | शौचालय असलेचा दाखला | २०/-रु (प्रति प्रिंट) | ३०/- (प्रति प्रिंट) |
| ६ | ठेकेदार नसलेचा दाखला | २०/-रु (प्रति प्रिंट) | ३०/- (प्रति प्रिंट) |
| ७ | इतर सर्व दाखले | ——— | ३०/- (प्रति प्रिंट) |

सभागृहात वरील अशा स्वरूपाची चर्चा होवून ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

सुचक :- सौ.सपना जयेश मोरे .

अनुमोदक :- सौ.पूनम विशाल काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे

सभा विभाग

सर्वसाधारण सभा इतिवृत्त २३-२४ ठराव क्र.०९

दि. १७/०१/२०२४

विषय – देहू नगरपंचायत अंतर्गत नगररचना विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध विकास परवानग्यांकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्कांमध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव- देहू नगरपंचायत हद्दीत नगररचना विभागा मार्फत विविध बांधकामविषयक विकास परवानग्या देण्यात येतात. सदर परवानग्या देण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमन १९६६ चे कलम १२४अ(२) नुसार शुल्क आकारण्यात येते. सदर शुल्का व्यतिरिक्त देहू नगरपंचायत कार्यालया मार्फत आकारण्यात येणाऱ्या शुल्कांमध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणेकरिता व सुधारित दरांप्रमाणे त्वरित आकारणी करणेकरिता सभे मार्फत मंजुरी देण्यात आली.

| अ.क्र. | शुल्काचा प्रकार | विद्यमान दर | सुधारित दर |
|---|---|---|---|
| १. | राडारोडा शुल्क | भूखंड क्षेत्राच्या १०/- रु.प्रती चौ.मी. | भूखंड क्षेत्राच्या १५/- रु.प्रती चौ.मी. |
| २. | वृक्ष लागवड शुल्क | रु. १५००/- | भूखंड क्षेत्राच्या ०२/- रु.प्रती चौ.मी. |
| ३. | अग्निशमन पायाभूत सुविधा शुल्क | रु.५०००/- | अग्निशमन पायाभूत सुविधा शुल्क हे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (सुधारणा) अधिनियम, २०२३ नुसार आकारण्यात यावे. |
| ४. | भोगवटा प्रमाणपत्र | बांधकाम क्षेत्राच्या १०/- रु.प्रती चौ.मी. | बांधकाम क्षेत्राच्या १५/- रु.प्रती चौ.मी. |
| ५. | विना भोगवटा प्रमाणपत्र बांधकामाचा भोगवटा/वापर सुरु केल्यास दंड | बांधकाम क्षेत्राच्या १०/- रु.प्रती चौ.मी. | बांधकाम क्षेत्राच्या २०/- रु.प्रती चौ.मी. |
| ६. | अनामत रक्कम | -- | बांधकाम क्षेत्राच्या ३०/- रु.प्रती चौ.मी.<br>सदरची अनामत रक्कम हि सदरचे बांधकाम देण्यात आलेल्या परवानगी नुसार केल्यास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर संबंधितास परत करणेत येईल.<br>सदरचे रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय राहणार नाही.<br>तसेच संबंधित बांधकाम धारकाने बांधकाम परवानगी दिलेल्या दिनांकापासून ०४ वर्षांचे आत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणेकरिता अर्ज केला नाही किंवा दिलेल्या परवानगी नुसार बांधकाम केले नाही तर जमा केलेली अनामत रक्कम जप्त करणेत येईल. |

सुचक:- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा

देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. १० :- देहू नगरपंचायत कार्यालयाकडून देण्यात येणारे विविध व्यवसाय अनुज्ञप्ती/ व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र / व्यवसाय नुतनीकरण शुल्क करणेबाबतच्या दरास मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. १० :- उपरोक्त विषयान्वये आपणास सविनय सादर करणेत येते की,महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दि. २१.०८.२०१५ च्या अधिसूचनेन्वये केंद्र शासनाच्या Ease of Doing Business च्या अनुषंगाने महत्वाच्या असलेल्या मालमत्ता कर, पाणी पुरवठा वसुली, ना हरकत प्रमाणपत्र व व्यवसाय परवाना या ४ घटकांतर्गत येणाऱ्या सेवांचा व सदर सेवांकरीता आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकालमर्यादा, पद निर्देशित अधिकारी तसेच प्रथम व द्वितीय अपिलिय अधिकारी इ. बाबी अधिसूचित करण्याबाबत शासनाने नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दिनांक : ०४ सप्टेंबर २०१७ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ कलम ३ अन्वयेना हरकत प्रमाणपत्र फी नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दरानुसार आकारण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरील विषय महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक अधिनियम १९६५ चे कलम १०१, महाराष्ट्र लेखा संहिता २०११ मधील तरतुदीनुसार मा. मुख्याधिकारी सादर करतील. त्यानुसार विविध व्यवसाय अनुज्ञप्ती शुल्क / व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र फी / नुतनीकरण शुल्कघेण्यात येत आहे.

तरी सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता सदरील व्यवसाय अनुज्ञप्ती शुल्क / व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र फी / नुतनीकरण फी खालीलप्रमाणे .

| अ. क्र. | व्यवसायाचा प्रकार | सन २०२३-२०२४ चे प्रस्तावित दर (रु.) | अ. क्र. | व्यवसायाचा प्रकार | सन२०२३-२०२४ चे प्रस्तावित दर (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १) | मंगल कार्यालय | १५,०००/- | २६) | इलेक्ट्रिक मटेरिअल | २,५००/- |
| २) | कॉलेज | १५,०००/- | २७) | केबल व्यवसाय | २,५००/- |
| ३) | मार्ट | २०,०००/- | २८) | छोटे कापड दुकान | २,५००/- |
| ४) | रेस्टॉरंट, मोठे हॉटेल, लॉजिंग | १५,०००/- | २९) | छोटे हॉटेल | २,५००/- |
| ५) | डिझेल, पेट्रोल पंप | १५,०००/- | ३०) | मैल टँकर | ३,०००/- |
| ६) | मोठे कापड दुकान, शोरूम | १५,०००/- | ३१) | प्रोडक्शन कंपनी | ७,५००/- |
| ७) | शाळा | ५,०००/- | ३२) | चश्मा विक्री व दुरुस्ती | २,०००/- |
| ८) | सराफ (ज्वेलर्स) | ७,०००/- | ३३) | मोबाईल शॉप विक्री / दुरुस्ती | २,०००/- |
| ९) | बँकिंग | ७,०००/- | ३४) | किराणा दुकान | १,५००/- |
| १०) | हॉस्पीटल (With bed) | १०,०००/- | ३५) | ट्रान्सपोर्ट / लॉजिस्टिक | १,५००/- |
| ११) | | | ३६) | क्लासेस/ अॅकॅडमी | ५,०००/- |
| १२) | वाहन विक्री | १०,०००/- | ३७) | जनरल स्टोअर्स | १,०००/- |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३) | बिल्डिंग मटेरिअल | ७,५००/- | ३८) | भांडी दुकान | १,०००/- |
| १४) | फर्निचर दुकान | ७,५००/- | ३९) | चप्पल दुकान | १,०००/- |
| १५) | क्लिनिक / दवाखाना | ५,०००/- | ४०) | ऑटोमोबाईल(वाहन दुरुस्ती) | १,०००/- |
| १६) | बी, बियाणे व खते विक्रेते | ५,०००/- | ४१) | प्रिंटिंग प्रेस | १,०००/- |
| १७) | टि.व्ही.,फ्रीज विक्रेते / शोरूम | ५,०००/- | ४२) | भंगार | १,०००/- |
| १८) | पतसंस्था | ५,०००/- | ४३) | सी. सी. टी.व्ही. | १,०००/- |
| १९) | बेकरी | २,५००/- | ४४) | लॉंड्री | १,०००/- |
| २०) | कॅफे | ५,०००/- | ४५) | इतर मोठे व्यवसाय | ४,०००/- |
| २१) | मेडिकल स्टोअर्स | ५,०००/- | ४६) | फेब्रीकेशन | ३,०००/- |
| २२) | हार्डवेअर | ३,०००/- | | | |
| २३) | स्वीटहोम + डेअरी | २,५००/- | | | |
| २४) | बालवाडी, अंगणवाडी, नर्सरी | ३,०००/- | | | |
| २५) | इतर छोटे व्यवसाय | १,०००/- | | | |

(टीप : वरीलव्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र दरवर्षी आर्थिक वर्षात नूतनीकरण करणे आवश्यक आहे. सदरील व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्रवेळेवर नूतनीकरण न केल्यास त्यावर २,०००/- रु. दंड आकरण्यात येईल.)

वरील अशा स्वरूपाची चर्चा होवून ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

सुचक :- श्री. योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२३-२४ ठराव क्र.११
दि. १७/०१/२०२४

विषय :- महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम,२००१ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक ३१/१२/२०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड/बांधकामे नियमाधीन करणे बाबत नगरपरिषद अधिनियम १९६५चे कलम ८१(४)अन्वये दिलेल्या प्रस्तावावर निर्णय होवून मिळणे बाबत.

संदर्भ : १) नगरविकास विभाग अधिसूचना क्र. २०१९ /प्र.क्र २१५ नवि १८ दि. ०३ ऑगस्ट २०२१
२) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण दर्जावाढ व नियंत्रण) अधिनियम२००१
३) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाआधीन करणे श्रेणी वाढ व नियंत्रण) सुधारणा अधिनियम २०२१ दिनांक १२ मार्च २०२१
४) नगरविकास विभाग परिपत्रक गुंठेवा -१०२ //प्र. क्र.०७/२०२२/नवि-३० दिनांक २० जानेवारी २०२२
५) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ) पुणे यांचे परीपत्रक क्र.सीटीएस/ना.भू.४/०३ दिनांक १६/१२/२००३

ठराव - वरील विषयास अनुसरुन सविनय सादर की, उपरोक्त संदर्भ क्रमांक १ नुसार देहू,माळीनगर व विठ्ठलनगर या भूतपूर्व ग्रामपंचायती मिळून देहू नगरपंचायतीची स्थापना करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात गुंठेवारी श्रेणीवाढ विकास अधिनियम २००१ अन्वये गुंठेवारी अधिनियम अमलात आला. संदर्भ क्रमांक ३ अन्वये गुंठेवारी अधिनियम २००१ मध्ये सुधारणा करण्यात आली असून सदर अधिनियमाचे कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ३१ डिसेंबर २०२० पूर्वीच्या सर्व बांधकामांना गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत नियमित करणे अनुज्ञेय केले आहे.

संदर्भ क्र. ३ नुसार विकास नियमाधीन करताना भुखंडाच्या हद्दी निश्चित करण्यासाठी अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडील मोजणी नकाशा प्राप्त करण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्राअन्वये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

गुंठेवारी विकासाच्या अनुषंगाने अस्तित्वात असलेले अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रकातील खालील तरतुदीकडे लक्ष वेधण्यात आले.

१२.०३.२०२१ रोजी महाराष्ट्र गुंठेवारी विकास( नियमाधीन करणे ,श्रेणीवाढ व नियंत्रण ) व अधिनियम २००१ मधील कलम ३(१) मध्ये दि १२.०३.२०२१ रोजी सुधारणा करण्यात आली असून ३१.१२.२०२० पर्यन्त गुंठेवारी अंतर्गत झालेले विकास नियमाधीन करता येतात .

उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये गुंठवारी विकास नियमाधीन करण्याची कार्यपद्धती नमूद करण्यात आलेली आहे . सदर कलमाच्या ४(२) मध्ये अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्रांची तपशील नमूद असून (ख )(घ) मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे

(ख ) विद्यमान रेखांकन आराखडा

(घ) दुरूस्ती आराखडा

उक्त अधिनियमाच्या कलम ८ (१) मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे . नियोजन प्राधिकरणाला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तिला,

(ख) अशा जमिनीची किंवा इमारतीची कोणत्याही मोजणी किंवा सर्वेक्षण किंवा पृष्ठभागाचे मोजमाप करून घेण्याच्या

(ग) सीमा व नियोजित विकास व रेषा निश्चित करून व त्या चिन्हांकित करून घेण्याच्या प्रयोजनार्थ,सहाय्यक किंवा कामगार यांच्या सह किंवा त्यांच्या शिवाय , कोणत्याही जमिनीवर अथवा इमारतीत प्रवेश करता येईल.

४ . शासनाने दि २.१२.२०२० रोजी मंजूर केलेली एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली गुंठेवारी विकासासाठी लागू असून सदर नियमावलीमधील नियम क्रं २.२.३ (२) नुसार विकास परवानगीसाठी भूमी अभिलेख विभागाकडील मुळ मोजणी जमीन मालक विकासक यांचेकडून नियोजन प्राधिकरणास सादर होणे आवश्यक आहे .

Scanned with OKEN Scanner

५.गुंठेवारी विकास नियमित करताना आकारावयाचे प्रशमन शुल्क व विकास शुल्क दि १८.१०.२०२१ रोजीच्या शासन
निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये मुळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक ( FSI) पेक्षा अधिक केलेल्या बांधकामाची कमाल मर्या
बांधकामासाठी आकारावयाचे प्रशमन शुल्क नमूद करण्यात आले आहेत.

६. जमाबंदी आयुक्त आणि संचालक , भूमी अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ) पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं सिटी एस /ना
दि.१६.१२.२००३ मध्ये गुंठेवारी प्रकरणात करावयाच्या मोजणीबाबत कार्यपद्धती नमूद आहे.

वरील बाबींचा विचार करता महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधीन करणे ,श्रेणीवाढ व नियंत्रण ) व अधिनि
मधील तरतुदीनुसार गुंठेवारी विकास नियमाधीन करताना जमाबंदी आयुक्त संचालक भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांच
१६.१२.२००३ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने देहू नगरपंचायतीने वरील शासन परिपत्रकाप्रमाणे नगरपंचायत हद्दीतील गुंठेवारी विकास अधिनियम
अन्वये दि. १ जानेवारी २००१ पूर्वीचे अनाधिकृत भूखंड व त्यामधील बांधकामे नियमित करणेची कार्यवाही करणे महाराष्ट्र
राजपत्रामध्ये दि.१जानेवारी.२००१ नंतर या मजकुराऐवजी,दि. ३१/१२/२०२० नंतर हा मजकूर दाखल करण्यात येईल असे नमूद के

देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असल्याने गुंठेवारी अधिनियम २००१ चा लाभ नगरपरिषदेचा झालेला नाही.
शहरातील अनाधिकृत भूखंड व बांधकामे नियमाधिन झालेली नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १२/३/२०२१
३१/१२/२०२० पर्यंतचे अनाधिकृत भूखंड व बांधकामाचे, गुंठेवारी अधिनियमान्वये नियमितीकरणाच्या गरजेचे आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या अधिनियमाच्या कलम ४(१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सहा महिन्याच्या आ
नियोजन प्राधिकरण परवानगी देईल अशा वाढवून दिलेल्या मुदतीत संबंधित भूखंड धारक गुंठेवारी विकास अधिनियम करण्यात नि
करण्यासाठी अर्ज करतील असे नमूद आहे . सदर तरतुदीचा विचार करता सदर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर सहा महिने असा का
ठेवणे योग्य वाटते तथापि वरील प्रशासकीय प्रस्तावास मान्यता मिळनेस सविनय सादर.

वरील कार्यालयीन टिपणीची सभेने नोंद घेतली यावेळी गुंठेवारी रेखांकनातील रस्त्यांची किमान रुंदी ४.५० मी. ठेवण्यात या
सभेने निर्देश दिले.तसेच सदर नियमितीकरणाकरीता वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे नागरिकांना जाहीर आवाहन करणेत यावे अश्या सूचना सभे
देण्यात आल्या.याकामी येणाऱ्या खर्चास सभेने मंजुरी दिली.तसेच सदर नियमितीकरणाकरीता ०६ महिन्याच्या कालावधीकरिता नागरिक
नियमितीकरणा करिता प्रस्ताव दाखल करून घ्यावे असे ठरले.तसेच सदर कालावधीकरिता मुदतवाढीची आवश्यकता असल्यास सभेची
देण्यात यावी अश्या सूचना देण्यात आल्या.

सुचक:- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक:- श्री.प्रविण रामदास काळो

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा

दिनांक :- १७/०१/२०२४

विषय क्रमांक :- १२

ठराव क्रमांक :- १२

विषय क्र. १२ :- देहू नगरपंचायत मधील महिला व बालकल्याण समिती मार्फत महिलांसाठी हळदी कुंकु कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव १२ : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती मार्फत देहू नगरपंचायत हद्दीतील महिलांसाठी अनेक प्रकारची प्रशिक्षणांचे आयेजान करण्यात आलेले असून त्या सर्वांत महिलांनी भरपुर प्रतिसाद दिलेला आहे. सध्या मकरसंक्रांती निमित्त सगळी कडे हळदी कुंकवाचे कार्यक्रम सुरु आहेत. तेव्हा देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती मार्फत महिलांसाठी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन मंगल कार्यालयात करण्यात यावे.

त्या ठिकाणी महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तज्ञ मार्गदर्शकांना बोलविण्यात येवुन महिलांना मार्गदर्शन करण्यात यावे. महिलांसाठी हळदी , कुंकु, पान, सुपारी, तिळगुळ, गुलाबपुष्प व आलपोपहार देण्यात यावे. यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ पौर्णिमा बि. परदेशी

अनुमोदक :-
सौ. प्रियंका अ. मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

Raivale
नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा

दिनांक :- १७/०१/२०२४

विषय क्रमांक :- १३

ठराव क्रमांक :- १३

विषय क्र. १३ :- १५ वा वित्त आयोग / न.प. फंड मधुन देहू नगरपंचायत हद्दीमधील पाणी पुरवठा वॉटर ऑडिट करण्याच्या दृष्टीने एअर व्हॉल बदलणे रॉ वॉटर फिल्टर वॉटर व मुख्य टाकीला फ्लो मिटर बसवणे व आवश्यक त्या ठिकाणचे ल्सूयश व्हॉल बदलणेकामी चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव १३ : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत MJP कडून सद्यस्थितीत चालू असलेली पाणी योजना सन २०१६ मध्ये कार्यान्वित करून नगर पंचायत कडे दि.०१ जुलै २०१९ मध्ये हस्तांतरित करण्यात आलेली आहे.मात्र सदर पाणी पुरवठा योजनेमध्ये काही ठिकाणी पाणी गळती होत असून पाण्याचा अपव्यय होत असून ते रोखण्यासाठी व इतर त्रुटी शोधण्यासाठी संपूर्ण पाणी पुरवठा योजनेWater Audit करून घेणे उचित वाटते त्यासाठी खाली ३ कामे प्राधन्याने करणे आवश्यक आहे.

१) टेम्परप्रूफ एअर व्हॉल्व् (Tamper Proof Air Vavles)-

कामाचे स्वरूप- शुद्ध आणि अशुद्ध पाणी वाहक नलिकेवर डबल बॉल एअर व्हॉल्व् च्या ऐवजी आधुनिक ट्रिपल फंक्शान टेम्परप्रूफ एअर व्हॉल्व् बसविणे.

पाणी पुरवठा योजनेमध्ये पाणी वाहक नलिका जास्त कालावधी टिकण्यासाठी एअर व्हॉल्व् चा वापर केला जातो. नलिकेमधील पाण्याचा दाब व्यवस्थित राहून पाण्यासोबत असलेली अतिरिक्त हवेचा दाब बाहेर टाकला जातो त्यामुळे वारंवार पाणी वाहक नलिकेला होणारी गळती कमी होऊन पाणी वाहक नलिकेचे आयुष्य वाढते. आधुनिक ट्रिपल फंक्शान टेम्परप्रूफ एअर व्हॉल्व्ह चे मटेरीअल हे डक्टाइल आयर्नचे (DI) असल्याने त्यात उत्कृष्ट गंज प्रतिकार शक्ती आणि तन्यता शक्ती आहे तसेच फिटिंग्ज साठी मजबूत आणि विश्वासार्ह सामग्री असल्याने पाणी चोरीसाठी सहजासहजी टेम्परप्रूफ एअर व्हॉल्व् ला गळती करता येत नाहीत. सर्वात महत्वाचे म्हणजे टॅपर प्रूफ एअर व्हॉल्व्ह हे देखभालदुरुस्ती मुक्त तसेच जास्त दिवस टिकणारे व्हॉल्व् आहेत. यामुळे वारंवार देखभालदुरुस्ती साठी केला जाणारा मोठ्या प्रमाणातील अतिरिक्त खर्च कमी होऊन नगर पंचायतचा आर्थिक फायदा होण्यास मदत होते.

२) ग्लॅडलेस स्लुईस व्हॉल्व् (Sluice Valves)-

**कामाचे स्वरूप-** शहरातील पाणी पुरवठा योजनेतील सर्व महत्वाच्या ठिकाणांवरील स्लुईस व्हॉल्व् बदलणे.

शहरातील पाणी पुरवठा योजनेमध्ये पाणी वेळेवर वितरित करणे आणि बंद करणे या कामासाठी मोठ्या प्रमाणात स्लुईस व्हॉल्व् चा वापर केला जातो पण वारंवार या व्हॉल्व् चा वापर केल्याने अगदी कमी काळातच या व्हॉल्व् चे सूत खराब होणे, व्हॉल्व् ला गाळा पडणे यासारख्या अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे सध्याच्या व्हॉल्व् दुरुस्तीचे काम वरचेवर निघत राहते. यासाठी ग्लॅडलेस स्लुईस व्हॉल्व्चा वापर केल्याने पाण्याची गळती थांबवून वारंवार स्लुईस व्हॉल्व्

Scanned with OKEN Scanner

बदलण्याची किंवा दुरुस्ती करणेची गरज भासत नाही तसेच वारंवार पाणी पुरवठा योजनेमध्
अडथळा येत नाही. वारंवार केला जाणारा मोठ्या प्रमाणातील अतिरिक्त खर्च कमी होऊन नग
पंचायतचा आर्थिक फायदा होण्यास मदत होते. पारंपारिक कास्ट आयर्न व्हॉल्व् च्या तुलनेत
ग्लॅन्डलेस स्लूइस व्हॉल्व् चे मटेरीअल हे डक्टाइलआयर्नचे (DI) असल्याने त्यात उत्कृष्ट गं
प्रतिकार शक्ती आणि तन्यता शक्ती आहे. तसेच फिटिंग्ज साठी मजबूत आणि विश्वासार्ह सामग्री
आहे. व्हॉल्व् मधे बसवलेले लवचिक रबर हे पॉलीमाईड रबर पासून बनवलेले आहे. हे पॉलीमाईड
रबर पेयजल प्रमाणित आहे.

३) फ्लो मीटर बसविणे :

कामाचे स्वरूप- पाण्याच्या मोजमापनासाठी पाणीपुरवठा योजनेवर मीटर बसविणे.

महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या नियमानुसार शहरासाठी ज्या पाण्याच्या स्रोत मधून पाणी घेतले जाते ते पाणी मीटर ने मोजून घेणे गरजेचे आहे. असे केले नाही तर पाटबंधारे विभागाकडून अतिरिक्त पाणीपट्टी आकारली जाते. पाणीपट्टी मधील दंडाची रक्कम कमी होण्यासाठी जॅकवेळ येथे वॉटर मीटर बसविणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच जलशुद्धीकरण केंद्र आणि पाणी पुरवठा योजने मधील सर्वात महत्वाची एक टाकी ज्या मधून संपूर्ण शहरास पाणी पुरवठा केला जातो अशा या ठिकाणी मीटर बसविणे गरजेचे आहे, ज्यामुळे पाणीपुरवठा योजनेमधील शासन नियमानुसार NRW (Non Revenue Water) किती आहे याचे मोजमापन करणे सोपे होईल. अशा स्वरूपाची चर्चा होउन त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री.योगेश बा.परंडवाल.

अनुमोदक :- श्री.सुधिर सु.काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

दिनांक :- १७/०१/२०२४
विषय क्रमांक :- १४
ठराव क्र.१४

**विषय— जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील भक्त निवास संदर्भात दिनांक ०७/०९/२०२३ च्या पत्रावर चर्चा व विनिमय करुन निर्णय घेणे.**

जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन कार्यालय पुणे यांचेकडील दिनांक ०७/०९/२०२३ रोजीच्या पत्रानुसार श्री माऊली काळोखे यांचे दिनांक २१/०८/२०२३ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्री क्षेत्र देहू येथे तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामधून वैकुंठ भूमी येथे भक्तनिवास बांधण्यात आले आहे. सदर भक्त निवास श्री संत तुकाराम महाराज देवस्थान यांचे ताब्यात असून त्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी व वारकरी यात्रेकरु यांची पाहिजे तशी सोय केली जात नाही व त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते असे निवेदनात म्हटले असून भाविकांची नाराजी दुर करण्यासाठी भक्त निवास करीता स्थानीक पातळीवर सल्लागार समिती स्थापन करावी असे निवेदनात श्री ज्ञानोबा किसन काळोखे यांनी नमूद केले आहे.

श्री ज्ञानोबा किसन काळोखे यांनी दिलेल्या निवेदनावर सविस्तर चर्चा करण्यात आली सदर भक्त निवासबाबत मा. जिल्हाधिकारी व संस्थान यांचा सामंजस करार झालेला असून त्याप्रमाणे त्यांचा ताबा संस्थानाचा आहे सदरची बाब ही मा. जिल्हाधिकारी महोदय, यांच्या अधिपत्याखाली असल्याने सदर भक्त निवास येथे सल्लागार समिती नेमणेबाबत वरीष्ठ पातळीवर निर्णय घेण्यात यावा.

योगेश काळोखे
सुचक

सपना मोरे
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील नळ कनेक्शन धारकांचे नळ बिल माफ करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्रमांक - १५
दिनांक -१७/०१/२०२३

ठराव क्रमांक –१५
दिनांक - १०/०१/२०२३

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा होत असून देहू नगरपंचायती मार्फत नळ कनेक्शन धारकांना नळकनेक्शन प्रती महिना रक्कम रु.२५०/- प्रमाणे वार्षिक रक्कम रु.३०००/- बिल आकारले जात आहे. नळ धारकांना पाणी येत नसल्याने या कारणामुळे पाणी पट्टी माफ करणेबाबत/सदर नळधारकांची मागणी नळकनेक्शन नसणे/दुबार जोडणी आकारणी झाले कारणाने मागणी कमी करावयाची आहे. या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत.सध्यस्थितीत आज अखेर बरेच अर्ज देहू नगरपंचायत कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर अर्जाची पाहणी केली असता जे नळधारक नळ बिल माफीसाठी प्राप्त आहेत. अश्या नळधारकांना नळ बिल माफी साठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

सूचक :- श्री सुधिर सुरेश काळोखे

अनूमोदक : सौ. पुनम वि. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक -१६
दिनांक -१७/०१/२०२४

ठराव क्रमांक -१६
दिनांक - १७/०१/२०२४

विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील मिळकत धारकांचे पिण्याचे पाणीचे सध्यस्थितीत असलेले अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करणे बाबत व त्यांना दंड ठरवणे तसेच व्यवसायिक नळ कनेक्शन बाबत धोरण ठरविणेसाठी चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नगरपंचायत मार्फत शहरात पाणीपुरवठा होत असून नळकनेक्शन धारकांना प्रती महिना रक्कम रु.२५०/- प्रमाणे वार्षिक रक्कम रु.३०००/- बिल आकारले जात आहे. देहू नगरपंचायती मार्फत मार्च २०२३-२४ या आर्थिक वर्षात पाणी पट्टी वसुली करताना अनेक नळ धारकांचे नळ कनेक्शन अनधिकृत आढळून येत आहेत ज्यांचे नळ कनेक्शन अनधिकृत आहेत त्यांचे अधिकृत करण्यासठी रक्कम रु.२०,०००/- (वीस हजार रक्कम रु.)दंड आकारण्यात यावा.व आवश्यक ती सर्व कागदपत्रे घेऊन नळ कनेक्शन अधिकृत करण्यात यावे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे.

सूचक : श्री.सुधिर सुरेश काळोखे.

अनूमोदक : सौ. शितल अनिल हगवणे.

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत, स्थापना सन २०२०, ता. हवेली, जि. पुणे

अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा.अध्यक्ष साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे ..........

सर्वसाधारण सभा

दिनांक :-17/01/2024

विषय क्रमांक :- 17

ठराव क्रमांक :- 17

विषय क्र. 17 :- शासन परिपत्रक स्थायी निदेशाप्रमाणे मा.मुख्याधिकारी यांना निवासस्थान भाडे अदा करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. 17 :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. मा.शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.सीपीओ-१४७८/सी.आर-३२७/ सेवा-५ दि.१७ एप्रिल १९७८ अन्वये शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे वर्गवारीनुसार शासकिय निवासस्थानाचे प्रकारानुसार चटई क्षेत्र (चौरस फुट) निवासस्थान क्षेत्र अनुज्ञेय करणेत आले आहे. मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.सीओडी २४८२/सीआर ०४/व्ही/ दि.१५.०३.१९८४ नुसार प्रत्येक नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांचेसाठी नगरपरिषदेचे स्वताचे निवासस्थान असणे आवश्यक आहे. तथापी स्वताचे निवासस्थान उपलब्ध नसलेल्या नगरपरिषदांनी भाडेपट्टयाने किमान तीन खोल्या व किचनसह निवासस्थान नप.-नपं. मुख्याधिकारी यांना उपलब्ध करून देणेबाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. तसेच संचालनालयाकडील सुधारित स्थायी निदेश ०३/२००३ क्र.नपप्रस/स्थायी नि./०३/मु.अ.निवास्थान/ कक्ष-१२/४८७० दि.०५.०९.२०२३ नुसार नगरपरिषद मुख्याधिकारी यांना १५ चौ.मी. आणि नगरपंचायत मुख्याधिकारी यांना १० चौ.मी. निवास क्षेत्र बांधणेस मंजूरी देण्यात आली असून तो पर्यंत नगरपरिषद/ नगरपंचायत स्वनिधीतून भाडयाने निवासस्थान उपलब्ध करून देणेचे निर्देश दिले आहेत.

देहू नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांचेसाठी स्वताचे निवासस्थान नसलेमुळे विद्यमान मुख्याधिकारी यांनी देहू नगरपंचायत क्षेत्रामध्ये खाजगी मालकीचे निवासस्थान ११ महिन्याचे भाडे कराराने उपलब्ध करून घेतले आहे. सदरचे निवासस्थानाचे क्षेत्र ४९.५६ चौ.मी. असून याबाबतचा नोंदणीकृत भाडेकरार त्यांनी सादर केला असून भाडयापोटी दरमहा रक्कम १२०००/- संबंधित मालमत्ताधारकास अदा करणेचे नमूद केले आहे.

मुख्याधिकारी यांनी शासकिय निवासाचे अनुपलब्धतेमुळे खाजगी निवासस्थान भाडे कराराने उपलब्ध करून घेतले असल्यास त्यांचे अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्र (चौरस फुट) त्यानुसार देय होणारे भाडे रक्कम ठरविणेबाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार शासनाचे समुचित विभाग अथवा नगरपंचायतचे रचना सहायक यांचेमार्फत मुल्यांकन करून घेऊन प्राप्त प्रमाणपत्रानुसार मुख्याधिकारी यांचे खाजगी निवासस्थानाची अनुज्ञेयतेनुसार होणारी भाडे रक्कम संबंधित मालमत्ताधारक यांना नगरपंचायत निधीतीतून अदा करणेस या ठरावा व्दारे प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेत येत आहे. करारनाम्या नुसार देय असलेली भाडे रक्कम अनुज्ञेय होणा-या भाडे रकमेपेक्षा जास्त झाल्यास तफावतीची रक्कम मुख्याधिकारी यांनी अदा करावी.

सुचक :- श्री मयुर द. शिवशरण

अनुमोदक :- श्री आदित्य चि. टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक 17/01/2024

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा

दिनांक :- १७/०१/२०२४

विषय क्रमांक :- १८

ठराव क्रमांक :- १८

विषय क्र. १८ :- देहू नगरपंचायत मार्फत २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन), व ८ डिसेंबर नगरपंचायत वर्धापन दिन साजरा करणे कामी आवश्यकती निविदा प्रक्रिया राबविणेबाबत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव १८ : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मार्फत प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी , स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट हा मोठा हर्षउल्हासात साजरा करण्यात येत असुन त्यादिवशी संपुर्ण इमारतीला रोक्षणाई तसेच विविध प्रकारची सजावट करण्यात येत असते. तसेच गावातील महत्वाच्या ठिकाणी विदयुत रोषणाई पण करण्यात येते. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या बरोबरच देहू नगरपंचायतीची स्थापना ०८ डिसेंबर २०२० रोजी झालेली असल्याने ०८ डिसेंबर हा दिवस नगरपंचायती मार्फत वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात यावा. त्या दिवशी संपुर्ण इमारतीला विदयुत रोषणाई करण्यात यावी तसेच इतरही सजावट करण्यात यावी. यासाठी भरपुर प्रमाणात खर्च होणार असुन या तिन्ही कार्यक्रमासाठी निविदा प्रक्रिया करण्यात येऊन त्यासाठी होणाऱ्या खर्चास आर्थिक प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री योगेश ना. परंडवाल

अनुमोदक :- सौ. रसिका म. हगवणे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १७/०१/२०२४

विषय क्रमांक :- १९
ठराव क्रमांक :- १९

विषय क्र. १९ :- २६ जानेवारी निमित्त क्लास ४ च्या कर्मचाऱ्यांना गणवेश घेणेबाबत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव १९ : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मध्ये ग्रामपंचायत कालिन कर्मचारी असलेले व अदयाप पर्यंत समावेशन न झालेले असे एकुण २३ कर्मचारी असुन यात लिपीक ४, शिपाई १, झाडुवाले ४, स्विपर ४, ड्रायव्हर ६, वायरमन १, वायरमन मदतनीस १, मजुर १ वरिल प्रमाणे कर्मचाऱ्यांना वर्षातुन दोन ड्रेस देण्यात आलेले नसल्याने त्यांना प्रत्येकी दोन ड्रेस देण्यात यावेत त्यामध्ये पुरुषांसाठी शर्ट पॅन्ट, महिलांसाठी साडी, ब्लाऊज, परकर, सलवार कुर्ती, ओढणी देण्यात यावी.

सदर कपडा देताना तो चांगल्या दर्जाचा असावा, सदर खरेदी हि शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोदयोग महामंडळ यांच्या कडुन आवश्यक ती प्रक्रियाकरुन खरेदी करण्यात यावे. तसेच कर्मचाऱ्यांचे ड्रेस हे शिवून देताना तीन स्थानिक दुकानदारांनकडुन शिलाईचे कोटेशन घेण्यात यावे व ड्रेस चांगल्या दर्जाचे शिवण्यात यावेत यासाठी होणाऱ्या खर्चास आर्थिक प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ. पुनम बि. काळोखे

अनुमोदक :- सौ. मिना रा. कुऱ्हाडे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १७/०१/२०२४
विषय क्रमांक :-२०
ठराव क्र.२०

विषय— वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान प्राप्त निधीतील कामामध्ये बदल करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली देहू नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन शुदधीपत्रक क्रमांक — नपावै-२०२१/प्र.क्र.१३३ (१६)/नवि-१६ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक १ ऑगस्ट २०२३ रोजी रक्कम रु ५००.०० लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले आहे. वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान मंजुर कामापैकी अ.क्र. ९, देहू नगरपंचायत हद्दीत माळीनगर मधील हनुमान मंदीर ते गवते यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, १० देहू नगरपंचायत हद्दीत माळीनगर मधील शिवाजी बाळासाहेब टिळेकर ते वसंत टिळेकर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ११ देहू नगरपंचायत हद्दीत माळीनगर मधील मारुती मंदीर ते बोडकेवाडी जिल्हा परिषद शाळेपर्यंत रोड रुंद करुण कॉक्रीटीकरण करणे या कामाऐवजी सन्मानीय सदस्य यांनी खालील कामे प्रस्तावित करणेबाबत मागणी केलेली आहे

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | माळीनगर येथील अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे. |
| २ | विवेक गायकवाड ते बोडके यांच्या निवासा पर्यंत रस्ता करणे. |
| ३ | माळीनगर येथील नवनाथ देवकर ते अतुल देवकर शेतजमीनी पर्यंत ड्रेनेज लाईनचे काम करणे. |
| ४ | देहू नगरपंचायत हद्दीत बोडकेवाडी येथे सभामंडप बांधणे |
| ५ | बोडकेवाडी येथील स्मशानभूमीचे सुशोभीकरण करणे. |
| ६ | देहू नगरपंचायत येथील कारकेनगर ३ अंतर्गत साईदर्शन हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्ता करणे. |

उपरोक्त प्रमाणे वैशिष्टपुर्ण कामासाठी अ.क्र. ९,१० व ११ या कामासाठी प्राप्त अनुदानातून वरील नमूद १ ते ६ कामे अंतर्भूत करण्याबाबत सन्मानीय सदस्य यांनी पत्राद्वारे मागणी केलेली असून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ पत्रानुसार वैशिष्टपुर्ण योजना / विशेष रस्ता योजना / नवीन नगरपालिका नगरपंचायत अनुदानामध्ये शासन स्तरावरुन निश्चित करण्यात आलेल्या कामांमध्ये बदल करणेबाबत प्राप्त होणाऱ्या निवेदनावर दिनांक १७ /११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये वैशिषपुर्ण योजनेचे निकष व सुधारीत मार्गदर्शक तत्वे निश्चित करणेत आलेली आहेत सदर शासन निर्णयातील परि ३ (i) (अ) नुसार योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांमधून जिल्हाधिकारी यांनी कामे निश्चित करावी किंवा आवश्यक त्या कामामध्ये बदल करावा असे नमूद केले आहे. त्यानुसार सभेमध्ये सदर विषयाबाबत चर्चा होवून अ.क्र.९,१०,११ ऐवजी वरील तक्तातील अ.क्र.१ ते ६ कामे अंतर्भूत करण्याबाबत सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

श्री. आदित्य टिळेकर
सुचक

सौ. ज्योती टिळेकर
अनुमोदक

Poivale
अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा इतिवृत्त २३-२४ ठराव क्र.२१
दि. १७.०१.२०२४

विषय – देहू नगरपंचायत हद्दीतील विविध उत्सव व सभांमध्ये उभारले जाणारे तात्पुरते मंडप यांना शुल्क आकारणी करणेबाबत.

ठराव- देहू नगरपंचायत हद्दीत हद्दीतील साजरे केले जाणारे विविध उत्सव,लग्न हळदी समारंभ तसेच सभांमध्ये तात्पुरते मंडप व कमानी उभारल्या जातात.सदरचे तात्पुरते मंडप हे अनेकदा सार्वजनिक रस्ते व जागांवर उभारले जातात. यांना शुल्क आकारणी करणेबाबत.सदरचे तात्पुरते मंडप व कमानी यांना खालील दरांप्रमाणे त्वरित शुल्क आकारणी करणेकामी सभेमार्फत मंजुरी देण्यात आली.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| १. | सण/उत्सव तसेच लग्न/हळदी समारंभ यांकरिता उभारले जाणारे तात्पुरते मंडप व कमानी. | प्रती चौ.फुट रक्कम रु.०२/-<br>(१५ दिवसांकरिता)<br>(केवळ ०१ कमान) |
| २. | महापुरुष यांच्या जयंती,सामाजिक उपक्रम,भजन,कीर्तन,प्रवचन,पारायण यांकरिता उभारले जाणारे तात्पुरते मंडप व कमानी. | प्रती चौ.फुट रक्कम रु.०१/-<br>(१५ दिवसांकरिता)<br>(केवळ ०१ कमान) |

सुचक:- श्री.योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक:- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - २२
दिनांक - १७/०१/२०२४

ठराव क्रमांक- २२
दिनांक -१७/०१/२०२४

विषयाचे नाव- देहू नगरपंचायत हद्दीतील सुका कचरा व ई-वेस्ट गोळा करणेकरिता एजन्सी नेमणूक करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू शहर हे महाराष्ट्रातील नामांकित तीर्थक्षेत्रांपैकी एक शहर असून भाविक भक्त लाखोंच्या संख्येने देहू शहरात येत असतात, अश्यात देहू नगरपंचायतने स्वच्छ सर्वेक्षण वर लक्ष केंद्रित केल्यास देहू शहराचा विकास चांगल्या गतीने होण्यास मदत होणार आहे. देहू नगरपंचायत आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाप्रमाणे माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियान अंतर्गत नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या टूलकिट नुसार तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशांमार्फत घरगुती घातक कचरा, ओला कचरा, सुका कचरा, ई- वेस्ट असा विलगिकृत कचरा नागरिकांकडून घेणे बंधनकारक असून कचरा डेपोवरती देखील विलगिकृत कचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. देहू शहरातील सुका कचरा व ई-वेस्टचे विल्हेवाट लावणे कामी विविध संस्थेशी समजुतीचा करार करून सुका कचरा व ई-वेस्टचे विल्हेवाट लावणे सोयीचे ठरणार आहे.

सदर कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान अभियान/राज्य स्तर/जिल्हा स्तर/ १५ वित्त आयोग/विशेष वैशिष्ठपूर्ण योजना/ न.पा.फंड/ विकास निधी/ स्वच्छ भारत मिशन अंतर्गत येणाऱ्या निधी यातुन करण्यात यावा.

सूचक : सौ. स्मिता शै. चव्हाण

अनूमोदक : सौ. सपना ज. मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

सौ. पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत
## सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा
दिनांक :-17/01/2024

विषय क्रमांक :- 23
ठराव क्रमांक :- 23

विषय क्र. 17 :- जुन्या ग्रामपंचायतीची जागा तात्पुरता स्वरूपात तलाठी कार्यालयासाठी उपलब्ध करून देण्यासाठी चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. 17 :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू तलाठी कार्यालय हे सदयस्थीतीत हनुमान मंदीर येथील सभागहात भरत आहे. तलाठी कार्यालयासाठी त्यांची स्वताची बांधीव इमारत नसल्याने त्यांची खुपच गैरसोय होत आहे. तसेच देहू माळीनगर विठ्ठलनगर साठी स्वतंत्र असे सर्कल ऑफीस मंजूर झालेले असून त्यांच्या ऑफीससाठी सदयस्थीतीत जागा उपलब्ध नाही. तेव्हा देहू नगरपंचायतीचे जुने कार्यालय येथे गो सदयस्थीतीत गोडाउन असून इतर कोणत्याही स्वरूपाचा वापर नाही. तेव्हा सदरचे जुने कार्यालय हे तात्पुरता स्वरूपात तलाठी ऑफीससाठी देण्यास काहीही हरकत नाही. ज्यावेळेस नगरपंचायतीस विकासकामांसाठी जुन्या नगरपंचायतीच्या जागेची आवश्यकता असेल. तेव्हा सदरची जागा तलाठी कार्यालयाने त्वरीत खाली करून देण्यात यावी. अशा स्वरूपाची चर्चा होवून ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- श्री.योगेश ह.काळोखे

अनुमोदक :- श्री.योगेश बा.परंडवाल.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक 17/01/2024

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १७/०१/२०२४
विषय क्रमांक :-२४
ठराव क्र.२४

**विषय—** देहू नगरपंचायत हद्दीमधील प्रभाग क्र १३ पोस्ट ऑफिस समोरील विश्वनाथ मुसुडगे ते मुंढेकर यांच्या घरासमोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीमधील प्रभाग क्र १३ पोस्ट ऑफिस समोरील विश्वनाथ मुसुडगे ते मुंढेकर यांच्या घरासमोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणे हे काम करण्यासाठी स्थानीक नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांच्याकडे रस्ता करणेबाबत मागणी केली आहे कामाची निकड व आवश्यकता विचारात घेता सदरचे काम हे वैशिष्टपुर्ण योजना / नगरोत्थान योजना / दलितेतर योजना अथवा शासनाच्या प्राप्त निधीतून निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक
श्री प्रविण रामदास कानोथे

अनुमोदक
सौ. सपना जयेश मोरे

देहू नगरपंचायत ता. हवेली, जि. पुणे. स्थापना सन २०२०

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - २५
दिनांक - १७/०१/२०२४

ठराव क्रमांक- २५
दिनांक -१७/०१/२०२४

विषयाचे नाव- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.९ अभंग हॉस्पिटल, साईनगरी, साईश्रुष्ठी पार्क येथे पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत. यात प्रामुख्याने प्रभाग क्र.९ अभंग हॉस्पिटल, साईनगरी, साईश्रुष्ठी पार्क या भागातील तक्रारी जास्त असून सदर ठिकाणच्या पाईपलाईन करणे गरजेचे असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ विविध शासकीय योजनेतून करण्यात यावा.

सूचक : सौ. स्मिता शै. चव्हाण

अनुमोदक : सौ. पौर्णिमा वि. परदेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ता. हवेली, जि. पुणे स्थापना जून २०२०

सौ. पूजा अ. दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत,देहू जि.पुणे
सभा विभाग
सर्वसाधारण सभा/इतिवृत्त/२३-२४ ठराव क्र. २६
दि. १७/०१/२०२४

विषय :- देहू नगरपंचायत हद्दीतील चव्हाणनगर भाग ३ मधील मयूर धनवट यांच्या घरापासून ते आनंद चव्हाण यांच्या घरापर्यंत बनवयाच्या रस्त्यासाठी एकवायर करण्यात येणाऱ्या जागेच्या बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना टी डी आर किंवा एफ एस आय देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव- देहू नगरपंचायत हद्दीतील चव्हाणनगर भाग ३ मधील मयूर धनवट यांच्या घरापासून ते आनंद चव्हाण यांच्या घरापर्यंत बनवयाच्या रस्त्यासाठी एकवायर करण्यात येणाऱ्या जागेच्या बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना टी डी आर किंवा एफ एस आय देणेबाबत यावेळी चर्चा करणेत आली. सदर जागेची पाहणी करून रस्त्याखालील क्षेत्र व त्या क्षेत्राची मालकी या बाबत माहिती घेनेचे सूचना देणेत आल्या.तसेच सदरचे रस्त्याचा वापर व त्यावर आवलंबून असणारे नागरिक यांचे करिता पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत माहिती सादर करणेच्या सूचना देणेत आल्या. यावेळी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील नियमांचे आवलोकन करून पुढील कार्यवाही करणेबाबत निर्णय झाला.

सुचक:- सौ.स्मिता शैलेश चव्हाण

अनुमोदक:- श्री.सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत देहू
ता.हवेली, जि.पुणे.
सर्वसाधारण सभा

ऐनवेळचा विषय
दिनांक :- १७.१.२०२४
विषय क्रमांक :- २७/१
ठराव क्रमांक :- २७/१

विषय क्र. 27/1 :- देहू नगरपंचायत कार्यालयातील विविध विभागातील कामकाजासाठी कुशल, अर्धकुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविणेचे कार्यकंत्राटदार यांना मुदतवाढ देणेबाबत चर्चा व विचार विनीमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. 27/1 :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

देहू नगरपंचायतचे नियमित कामगारांची संख्या कमी असलेगुळे नगरपंचायतच्या विविध विभागांचे दैनंदिन कामकाज व अत्यावश्यक सेवा सुरळितपणे पार पाडणेसाठी बाह्यसेवेव्दारे ठेकेदार यांचेकडून कुशल, अर्धकुशल व अकुशल मनुष्यबळ उपलब्ध करून घेणेत आले आहे. त्यानुसार बाह्यसेवेवरील कर्मचा-यांचे मदतीने नगरपंचायतचे दैनंदिन कामकाज पार पाडले जाते.

देहू नगरपंचायतचे सदर कामाचे सध्याचे ठेकेदार मे.रक्षक सिक्यूरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टीम प्रा.लि., धायरी, पुणे यांची मुदत माहे डिसेंबर २०२३ रोजी मध्ये संपुष्टात आली आहे. तथापी नगरपंचायतचे दैनंदिन कामकाज व अत्यावश्यक सेवेचा विचार करता सदरचे ठेकेदारास या कामाची निवीदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक असलेबाबत मुख्याधिकारी, देहू नगरपंचायत यांनी अहवाल सादर केला असून मुदवाढ मिळणेची मागणी केली आहे.

तरी सदर कामाची निवीदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रक्षक सिक्यूरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टीम प्रा.लि., धायरी, पुणे यांना मुदतवाढ देणेस ही सभा मंजूरी देत आहे. पुढील आवश्यक कार्यवाही मुख्याधिकारी यांनी करावी.

सुचक :- श्री योगेश ना. परंडवाल

अनुमोदक :- सौ. प्रियंका अ. मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक 17/01/2024

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत देहू
ता.हवेली, जि.पुणे
सर्वसाधारण सभा

ऐनवेळचा विषय
दिनांक :- १७.१.२०२४
विषय क्रमांक :- २७/२
ठराव क्रमांक :- २७/२

विषय क्र. 27/2 :- देहू नगरपंचायत हद्दीत बाजार फी वसुली/ आठवडे बाजार फी वसुलीचे कार्यकंत्राटदार यांना मुदतवाढ देणेबाबत चर्चा व विचार विनीमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. 27/2 :- सदर विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

देहू नगरपंचायतचे उत्पन्न वाढीचे अनुषंगाने नगरपंचायत हद्दीत रस्त्याचे फुटपाथवर, नगरपंचायत मालकीच्या जागेवर तसेच सरकारी जागेवर अतिक्रमण करून विक्री करणारे विक्रेते, दुकानदान व्यवसायिक तसेच दैनंदिन व आठवडे बाजारात भाजीपाल विक्री करणारे विक्रेते यांचेकडून बाजार फी वसुली/ आठवडे बाजार फी वसुली करणेबाबत धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार बोली पध्दतीने सदरचा ऑनलाईन लिलाव करून जास्तीचे बोली धारकास बाजार फी वसुली/ आठवडे बाजार फी वसुलीचे काम एक वर्ष कालावधीसाठी देण्यात आले असून बोलीची रक्कम चार टप्यात नगरपंचायत मध्ये भरणा करणेबाबत संबंधित लिलावधारकास कार्यादेश देण्यात आले आहेत.

सदर कामाचे लिलावधारक स्टुडीओ ९ तर्फे श्री.प्रल्हाद बाळासाहेब काळोखे रा.देहू, ता.हवेली, जि.पुणे यांची एक वर्ष कालावधीची मुदत माहे फेब्रुवारी २०२४ रोजी मध्ये संपुष्टात येत आहे. तथापी ऑनलाईन लिलाव प्रक्रिया करणेसाठी सध्या नगरपंचायतकडे लिलाव की नसलेमुळे व सदरची की शासनाचे संबंधित विभागाकडून प्राप्त करून घेणेस काही कालावधी लागणार असलेमुळे या कामाचे ई-लिलाव प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदरचे ठेकेदारास मुदतवाढ देणे आवश्यक असलेबाबत मुख्याधिकारी, देहू नगरपंचायत यांनी अहवाल सादर केला असून मुदवाढ मिळणेची मागणी केली आहे.

तरी सदर कामाची ई-लिलाव प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत स्टुडीओ ९ तर्फे श्री.प्रल्हाद बाळासाहेब काळोखे रा.देहू, ता.हवेली, जि.पुणे यांना मुदतवाढ देणेस ही सभा मंजूरी देत आहे. पुढील आवश्यक कार्यवाही मुख्याधिकारी यांनी करावी.

सुचक :- श्री मयुर द. शिवशरण

अनुमोदक :- सौ. ज्योती गो. टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक 17/01/2024

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

ऐनवेळचा विषय
दिनांक :- १७/०१/२०२४
विषय क्रमांक :- २७/३
ठराव क्र.२७/३

**विषय-- मौजे विठ्ठलनगर ता. हवेली जि.पुणे येथील सर्व्हे नं २ मधील जमीन मागणी व अतिक्रमण नियमित करण्याबाबत चर्चा व विनिमय करुन निर्णय घेणे.**

अर्जदार श्री धनाजी सखाराम जाधव रा. विठ्ठलनगर देहूगाव ता. हवेली जि.पुणे यांनी नगरपंचायत कार्यल्याकडे सादर केलेल्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मी एक माजी अपंग सैनिक सर्व्हीस नं २७५५८४७ असा असून मौजे विठ्ठलनगर सर्व्हे नं २ मधील गायरान जमीन १९८८ साली राहण्यासाठी व शेतीसाठी मागणी केलेल्या संदर्भाचे प्रकरण नगरपंचायत कार्यालय व जिल्हाधिकारी पुणे महसूल शाखा यांचे स्तरावर १९८८ पासून प्रलंबित असल्याचे अर्जदार यांनी दिनांक १३/०३/२०२४ रोजी दिलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे.

सभागृहात या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली देहू शहरामध्ये नगरपंचायतीकडे स्व:ताची स्वमालकीची जागा विकास कामांसाठी उपलब्ध नाही देहू शहराचे झपाट्याने औदयोगीकरण व नागरीकीकरण होत आहे त्यामुळे नागरिकांना भौतिक सुविधा देणे हे नगरपंचायतचे कर्तव्य आहे. देहू शहरामध्ये विकास कामांसाठी केवळ गायरान जमीन उपलब्ध असून येथेच विकास कामे करणे शक्य आहे आणि अर्जदार ज्या जागेत राहतात तेथे १ आर पेक्षा अधिक नाही एवढी जागा देणेबाबत हरकत नाही मात्र सदर गायरान जागेची मालकी ही महसूल विभागाचे असल्याने जमीन मागणी आणि अतिक्रमण नियमित करणे याबाबतचा अंतिम निर्णय महसूल विभागाने घ्यावा असे सर्वानुमते निर्णय झाला.

योगेश काळोखे
सुचक

आदित्य टिळेकर
अनुमोदक

P.Pirale
अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner